Postal Regd. No. NSK/RNP-244/2018-2020

रजि. नं. एम. ए. एच. एम. ए. आर./२००२/९५०६

# मजदूर संकेत

॥ हम करे राष्ट्र आराधन ॥



॥ भगवान प्रभु श्री विश्वकर्मा॥

* वर्ष : १९ वे * अंक : नववा * नाशिक, २५ सप्टेंबर २०२० * पाने : ३३ * वार्षिक वर्गणी : रु. १५० *

# ११ सितम्बर २०२० बीएमएस ने दिया रोजी, रोटी बचावका नारा

कोरोना महामारिकी वजहसे सबसे जादा परेशानी असंघटित मजदूर तथा प्रवासी मजदूरोंको उठानी पड रही है। उनका रोजगार चला गया, जहाँ ओ काम करते थे ओ शहर छोडके अपने गाव लोटना पडा, लेकीन परेशानी कम होने के बजाय बढ गयी क्योकी रोजगार तो यहा भी नहीं मिला पेट पालना मुश्किल हो रहा है और इसके अलावा रहनेकी समस्या, बीमारिमे दवा, राशन आदी समस्याओं से असंघटित और प्रवासी मजदूर दिन-प्रतिदिन जुझ रहे है। चर्चा और लगातार आंदोलन से भांमसंघने केंद्र सरकारपर दवाव बढाया जिसके चलते केंद्र सरकारने इन मजदूरोंको राहत देने के लिये स्वतंत्र प्याकेज घोषित करके राज्य सरकरों को केवल इन कामगारों के लिये जादा धान्य भेजा वैसेही कॅश भी भेजी, लेकीन राज्य सरकरों ने इसका इस्तेमाल ठीक तरह से न करने कीं वजह से मदत इन कामागरोंको मिलीही नहीं और आज भी ये मजदूर रोजगार और राशन से वंचित है। रोजगार चले जाने के कारण रोटी भी चली गयी और अन्य आवश्यकताओं पर संकट आ गया।

इन सब विषयों की चिंता करते हुए भांमसंघ ने फिरसे केंद्र और राज्य सरकारोंका ध्यान इन समस्याओं की और खिंचने के लिये ११ सितम्बर २०२० को देशव्यापी रोजी, रोटी बचाव आंदोलन किया और जीलाधिकारी द्वारा प्रदेश के मुख्यमंत्री और प्रधानमंत्रीको ज्ञापन प्रेषित किया। पुरे देश में सोशल डिस्टनसिंग का और अन्य नियमोंका पालन करते हुए ये आंदोलन हुआ। बहुत सारी समस्या होने के बावजूद आंदोलन को अच्छा रिस्पॉन्स मिला।

**कुछ झलकिया**







पूर्वी रेलवे कर्मचारी संघ


तामिळनाडू


उत्तर प्रदेश
भारतीय मजदूर संघ
वाराणसी


मध्य प्रदेश


भारतीय मजदूर संघ
उत्तर प्रदेश


छत्तीसगढ


राजस्थान
जोधपुर शहर


राजस्थान
जोधपुर शहर


राजस्थान
बीकानेर


राजस्थान
गंगानगर


भारतीय मजदूर संघ नाशिक जिल्हा


भारतीय मजदूर संघ नाशिक जिल्हा
महाराष्ट्र


पूर्व रेल्वे


TANGEDCO
तामिळनाडू


NAGAI
तामिळनाडू


तामिळनाडू
MADURAI

# विविध बैठकांचे संक्षिप्त वृत

## (१) महासंघ कोअर ग्रुप बैठक

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या कोअर ग्रुपची विशेष बैठक काही महत्त्वाच्या समस्यांवर व धोरणात्मक विषयावर चर्चा करण्यासाठी दिनांक १२ सप्टेंबर २०२० रोजी दुपारी ४ ते ६ दरम्यान व्हीडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून झाली. अध्यक्षस्थानी महासंघाचे अध्यक्ष जयप्रकाशजी होळीकर होते. महामंत्री शंकरराव पहाडे यांनी सूत्रसंचालन केले.

ह्या बैठकीत प्रामुख्याने निर्मितीचा एम ओ डी, पारेषणचा प्रस्तावित आकृतिबंध, मुख्य कार्यालय पातळीवरील समस्या व संघटनात्मक आढावा तसेच आर्थिक आढावा उदा. सदस्य नोंदणी, पगारवाढ निधी संलग्नता शुल्क आणि नंतर आगामी अधिवेशन व पदाधिकारी रचना आदी बाबतीत विस्ताराने चर्चा झाली.

झालेल्या चर्चेचा संक्षिप्त आढावा घेत महामंत्री शंकरराव पहाडे यांनी योग्य मार्गदर्शन केले. बैठकीचे अध्यक्ष जयप्रकाश होळीकर यांनी समारोप करतांना कामकाजाबद्दल समाधान व्यक्त केले. सर्वश्री सुभाष सावजी, दत्ता धामणकर, काडके नाना, सुभाष लोंढे व सौ. शर्मिला पाटील यांनी विषयानुसार चर्चेत भाग घेऊन विचार मांडले. श्री. एम. डी. पाटील यांच्याव्यतिरिक्त सर्व अपेक्षित पदाधिकारी उपस्थित होते. यापुढे उपस्थित राहू न शकणाऱ्यांनी आधी कळवून परवानगी घ्यावी, असे सर्वांना सूचित करण्यात आले.

## (२) महाराष्ट्र वीज कामगार महासंघ निर्मिती कंपनीची व्हीडीओ कॉंफेरेन्स बैठक संपन्न

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ निर्मिती कंपनीची व्हीडीओ कॉन्फरन्स बैठक दि. २६/८/२०२० रोजी दुपारी ३ ते ५ पर्यंत घेण्यात आली. मिटिंगकरिता मा.अध्यक्ष, मा.महामंत्री, मा.कार्याध्यक्ष, निर्मिती कंपनी पदाधिकारी, प्रदेशाचे निर्मिती संबंधित पदाधिकारी व सर्व झोन अध्यक्ष, झोन सचिव निमंत्रित होते. या मिटिंगमध्ये झोन सचिव, झोन अध्यक्ष यांचेकडून आपआपल्या झोनचा अहवाल खालील विषयाबाबत चर्चेमधून प्राप्त झाला व खालीलप्रमाणे विषयानुरूप चर्चा झाली, विषय :- १) सन २०१९ चा जमा-खर्च, सभासद शुल्क स्थिती, सभासद संख्या. २) सन २०२० ची आतापर्यंत प्रत्यक्ष सभासद नोंदणी झालेली संख्या. ३) पगार वाढ देणगी वस्तुस्थिती-जसे एकूण किती रकमेची देणगीपावतीचे वाटप केले, एकूण किती देणगी रक्कम झोनकडे जमा झाली त्यापैकी किती रक्कम केंद्राकडे जमा केली व झोनजवळ किती जमा आहे, किती देणगी सभासद यांचेकडून येणे बाकी आहे. ४) झोनमधील महत्वाचे विषय, समस्या. विषय क्रमांक ४ बाबत खालील मुद्यावर चर्चा करण्यात आली १) बंद निर्मिती संच प्राधान्याने चालू करण्यात यावे. २)भुसावळ, परळी व इतरही औष्णिक विद्युत केंद्रांना जवळच्या कोलमाईन्समधून कोळसा पुरविण्यात यावा ३)सर्व ठिकाणी कंत्राटी कामावर नियंत्रण असावे. ४)निर्मितीच्या कर्मचाऱ्यांनी कोविड १९ च्या काळातही आपल्या जीवाची पर्वा न करता सतत काम करून वीज उत्पादन चालू ठेवले, पण आता कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन कामाबाबत (OT) व्यवस्थापन नकारात्मकतेने वागत आहे. ५) उरण येथे हॉस्पिटलची व्यवस्था करावी, ६) विनंती बदली प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशेष लक्ष द्यावे. ७) सेवानिवृत्त होत असणारांचे पेन्शन ताबडतोब चालू करावी. ८) परळी येथे कल्याण अधिकारी देण्यात यावा व रिक्त पदे भरावे. ९) पॅरामाउंटकडुन मेडिक्लेम रक्कम पूर्ण मिळावी व नाव नोंदणी करण्याची अडचण येवू नये. १०) नवीन रुजू झालेल्या एल डी सी ना जाहिरातीत दिल्यानुसार पूर्ण पगार देण्यात यावा. ११) रजेचे रोखीकरण चालू करावे १२) पारस झोनच्या कामात सुधारणा होण्यासाठी तिकडे वरिष्ठांनी लक्ष घालावे, याबाबत सामूहिक चर्चा केल्यानंतर मा.विठ्ठल भालेराव कार्याध्यक्ष (निर्मिती) यांनी सर्व बाबींवर सर्व समावेषक मीमांसा केली. त्यानंतर मा. श्री. शंकर पहाडे (महामंत्री)साहेबांनी वरील विषय, समस्यांबाबत सविस्तर माहिती दिली. जसे आणखी विनंती बदली प्रकरणे काढणे, एल डी सी चे काम (स्टायपेंडवाढ) होईल व धोरणात्मक विषयांकरिता HO प्रकाशगड येथे पत्र पाठविले जाईल वगैरे, सदर मिटिंग आयोजित करून, संपूर्ण मिटिंगचे संचालन श्री. वसंत काळे, उपमहामंत्री (निर्मिती) यांनी केले. या VC मिटिंगमधे श्री. महादेव पराते, श्री. नामदेव सुरशे, श्री. मारोती पिंपळशेंडे, श्री. हेमंत बंड, श्री. संजय आमोदकर, श्री. भास्कर जोशी, श्री. विठ्ठल बागल, श्री. विलास भालेराव, श्री. योगेश ढाके, श्री. अनंत जाधव, श्री. दिनेश चंदनपाट, श्री. संतोष ताजने, श्री. ज्ञानेश्वर चरपे, श्री. राहुल महाजन, श्री. संतोष डगळे, श्री. राम कवठेकर, श्री. सखाराम घुगे हे मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. मिटिंगकरिता उपस्थित झाल्याबद्दल सर्वांचे आभार मानून मिटिंगची सांगता झाली.

## (३) महा पारेषण नासिक झोन बैठक

मा. वरिष्ठांच्या आदेशानुसार नाशिक पारेषण झोनमधील सर्व कार्यकर्ते, उपमहामंत्री, कंपनी कार्याध्यक्ष तसेच पारेषण उपाध्यक्ष व सचिव यांचा मिळून एक VC गृप तयार करून दि. २१/०८/२०२० रोजी सायंकाळी ८:०० ते १०:०० पर्यंत Video conference Meeting घेण्यात आली.

सदर मिटींगमध्ये खालील विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

१) पारेषण कंपनीतील लागू होणारा स्टाप सेटअप व निर्माण होणाऱ्या समस्यांविषयी चर्चा व कामगार कपातीला असलेला विरोध. २) सन २०१८ चा सभासद नोंदणी संलग्नता शुल्क, सभासद संख्या. ३) सन २०१९/२०२०ची सभासद नोंदणी झालेली संख्या ४) पगारवाढ देणगी एकूण किती रकमेची देणगी पावतीचे वाटप केले, एकूण किती देणगी रक्कम झोनकडे जमा झाली, त्यापैकी किती रक्कम केंद्राकडे जमा केली, किती देणगी सभासद यांचेकडून येणे बाकी आहे, ५) झोनमधील इतर समस्यांविषयी चर्चा करण्यात आली.

मिटींगमध्ये श्री. दंडारे साहेब, उपमहामंत्री, श्री. सोमवंशी साहेब, कार्याध्यक्ष, श्री. ठाकूर साहेब, उपाध्यक्ष, श्री. बैसाणे साहेब, श्री. भास्कर सोनवणे, श्री. आर. पी. मुंडे, श्री. धनराज बारी, श्री. किशोर भामरे, श्री. आर. बी. पाटील, श्री. रमाकांत वारूळे आणि इतर सभासद सहभागी होते. सदर मिटींग खूप छान नियोजन बद्ध आणि सविस्तर झाली.

सर्वांचे आभार मानून मिटींगचा समारोप झाला.

## (४) लातूर सर्कल बैठक

आज दि. १२-Sep-२०२० रोजी लातूर सर्कल बॉडीची VC घेण्यात आली. त्यात लातूर सर्कल पातळीवर व विभागीय पातळीवर महत्त्वाचे विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यात प्रदेश उपाध्यक्ष श्री. आंबेगावकर साहेब, वितरण सचिव श्री. नारायण गङ्गडे साहेब तसेच लातूर झोन अध्यक्ष श्री. सुधाकर माने साहेब यांनी सर्वांना मार्गदर्शन दिले.

## (५) नासिक टॉप ग्रुपची बैठक

नाशिकमध्ये तिन्ही कंपन्यांची कार्यालये आहेत. त्यांच्या संघटनात्मक कामात सुसूत्रता असावी यासाठी तिन्ही कंपन्यांच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश करून हा ग्रुप स्थापन केला आहे. कोरोनाग्रस्तांना मदत करण्यासाठी ह्या ग्रुपने अतिशय सुसूत्रपणे काम करून ग्रुपची यशस्वीता सिद्ध केली. ह्या ग्रुपच्या नियमित बैठकी होत असतात.

दिनांक १३ सप्टेंबर २०२० रोजी दुपारी ४ ते ५ दरम्यान अशाच एका संपर्क बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. काडके नाना यांनी प्रास्तविक करताना महत्त्वपूर्ण विषयांची माहिती दिली. त्यात प्रामुख्याने आर्थिक विषय व संघटनात्मक विषय होते. श्री. काटे यांनी वितरण झोनची तर भास्कर सोनवणे यांनी पारेषण झोनची माहिती दिली. निर्मितीचा प्रतिनिधी उपस्थित नव्हता.

वितरणमधील बदल्यामध्ये नाशिक झोन करीत असलेल्या गडबडीबद्दल श्री. काटे यांनी विस्ताराने माहिती दिली ह्याबाबत महामंत्री पहाडे साहेब यांचेशी संपर्क साधला असल्याचे त्यांनी सांगितले. यापुढे झोनच्या पदाधिकाऱ्यांनी अध्यक्ष, महामंत्री यांचेशी संपर्क साधण्यापूर्वी किंवा नंतर स्थानिक केंद्रीय पदाधिकाऱ्यांना माहिती द्यावी म्हणजे कम्युनिकेशन गॅप राहणार नाही, अशा सूचना देण्यात आल्या.

श्री. सोनवणे यांनीसुद्धा पारेषणमध्ये सुरू असलेल्या काही गोष्टींची माहिती दिली. चर्चेत श्री. बैसाने आर. एल. कुलकर्णी, अनिल अहिरे यांनी भाग घेत काही गोष्टींकडे लक्ष वेधले व त्या त्या विषयांवर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

श्री. मोतीकर यांनी समारोप केला. अध्यक्षीय समारोप करताना सुभाष लोंढे यांनी ह्या ग्रुपची विशेषता प्रतिपादन केली. मनमोकळ्या चर्चेबद्दल समाधान व्यक्त केले व नियमित बैठकांची आवश्यकता असल्याचे सांगितले.

श्रीमती सुमेधा वैद्य व विठ्ठल बागल वगळता सर्व अपेक्षित सदस्य उपस्थित होते. दोघांनीही आधी कळवले होते.

## (६) उस्मानाबाद सर्कल

उस्मानाबाद सर्कल कार्यकारणीची VC द्वारे बैठक आज दिनांक १३- ९-२०२० रोजी सकाळी ११:०० ते १२:३० या कालावधीत संपन्न झाली सदर बैठकीस महासंघाचे उपाध्यक्ष श्री दिलीप आंबेगावकर साहेब,महावितरणचे सचिव श्री नारायण गडगडे साहेब,झोन अध्यक्ष श्री सुधाकर माने तसेच ऊस्मानाबाद सर्कलचे सर्कल अध्यक्ष श्री एन के बडे व सहसचिव श्री समीर देवकर,संघटन मंत्री श्री नागेश माळी, तुळजापूर व उस्मानाबाद या दोन्ही विभागातील पदाधिकारी उपस्थित होते सदरील बैठकीत कोव्हीड १९ च्या महामारीपासुन संघटनात्मक कामात आलेली शिथीलता व पदाधिकारी यांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी चर्चासत्र व अजेंडावरील सर्व विषयावर चर्चा करण्यात आली सदरील बैठक श्री प्रवीण रत्नपारखी सर्कल सचिव ऊस्मानाबाद यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली धन्यवाद.

## (७) १९.०९.२०२० रोजी नाशिक (वितरण) झोनची बैठक VC द्वारे संपन्न झाली

यात

केंद्रीय पदाधिकारी -२ : श्री रवींद्र काडके, श्री राजेंद्र कुलकर्णी

झोन पदाधिकारी -३ : श्री संजय दुधाने, श्री हर्षल काटे, श्री अनिल अहिरे,

सर्कल पदाधिकारी : श्री गणेश कुंभारे, श्री सरोवरे, अहमदनगर, श्री सुनील पाटील, श्री शिवाजी मालुंजकर, नाशिक, श्री उद्धव जगताप, मालेगाव

श्री दीक्षित साहेब डोळ्याचे ऑपरेशन मुळे उपस्थित नव्हते.

श्री किरण भोसले झोन संघटक वैयक्तिक कामामुळे उपस्थित नाही.

## महापारेषण ची दृक-श्राव्य बैठक संपन्न

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ महापारेषण कंपनीची दूरचित्रद्वारे दृक-श्राव्य बैठक संपन्न झाली. या बैठकीत झोन अध्यक्ष व सचिव यांचेकडून झोनचा आढावा घेण्यात आला.

वेतनवाढ देणगी निधी संकलन, सन २०१९ ची सभासद संख्या, वर्ष २०२० ची सभासद नोंदणीचा आढावा, झोनमधील महत्वाचे विषय व समस्या.

स्टाफ सेटअप याबाबत सर्व उपस्थितांनी स्वमत व्यक्त केल्यानंतर पारेषण प्रभारी तथा प्रदेश उपाध्यक्ष श्री डी ए बर्वे यांनी संबोधीत केले. महामंत्री श्री शंकरराव पहाडे यांनी प्रस्तुत विषयावर मार्गदर्शन केले तसेच स्टाफ सेटअप बाबत प्रशासनास पत्र पाठवित असल्याची माहिती दिली. अध्यक्षीय मार्गदर्शन श्री सुनिल सोमवंशी कार्याध्यक्ष पारेषण यांनी केले.

बैठकीस प्रदेश सचिव श्री विश्वास भैरवकर, उपाध्यक्ष पारेषण श्री ए बी ठाकुर, सहसचिव सौ गितांजली राणे, निवासी सचिव श्री राजेंद्र जाधव, झोन अध्यक्ष श्री निखील चांद्रायण, श्री धनंजय बेल्हेकर, झोन सचिव श्री संतोष जाधव, श्री भास्कर सोनवणे इ पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

उपमहामंत्री पारेषण श्री एस एल दंडारे यांनी बैठकीचे आयोजन, संचालन केले व आभार व्यक्त केले.

**भारत माता की जय**







महा पारेषण बैठक
DA
A Barve (Guest)


11:59
34%
उस्मानाबाद सर्कल


77%
18:33
लातूर सर्कल
बैठक
Sudhakar Mane
Dilip Ambegaonkar
Bashir Shaikh (Guest)
Deepak katke (Guest)
Narayan Gadgade


नासिक वितरण


महासंघ कोअर ग्रुप


नासिक ट्रॉप

# वेधक वृत्त

## (१) आनंद वार्ता

नेशनल इंस्टिट्यूट फॉर लेबर इकोनॉमिक्स रिसर्च एंड डेवलपमेंट (NILERD) का नाम बदल कर दत्तोपंत ठेंगड़ी नेशनल इंस्टिट्यूट फॉर लेबर इकोनॉमिक्स रिसर्च एंड डेवलपमेंट किया गया है। इसके बारे में आज घोषणा की गई है।

श्रद्धेय दत्तोपंत ठेंगडीजीना जन्मशताब्दी वर्षात देशाची आदरांजली

## (२) लाभांश वाटप

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ सभासदांची बिजली कामगार सहकारी पतसंस्था धुळे

पतसंस्था व्दारे चालू वर्षी सभासदांना शेअर्स वर ९.५०%, ठेवीवर ९.५०% तर वर्गणी वर ६% लाभांश वाटपाचे काम संचालक व्दारा चालू आहे.

कर्जावर १०%व्याज आकारून काटकसरीने व्यवहार करून सभासदांना जास्तीत जास्त परतावा पतसंस्था दरवर्षी देत आहे. तसेच सेवा निवृत्त सभासदांनी कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर त्वरीत त्यांची जमा रक्कम अदा केली जाते. त्यासाठी सभासदांना पतसंस्थेच्या चकरा माराव्या लागत नाही. उलट सभासद न आल्यास संचालक फोन व्दारे त्यांना पैसे घेऊन जा म्हणून कळवीले जाते

सभासदांचा विश्वास व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांचा निस्पृह सेवाभाव व विना मोबदला काम करण्याची कामगार महासंघ ने दिलेल्या शिकवणी मूळेच हे शक्य झाले आहे. दरवर्षी चेअरमन व व्हा. चेअरमन बदलला जातो त्यामुळे पदाची आसक्ती नाही. *सेवा है यज्ञ कूंड समीधा सम हम जले* या उदात्त भावनेने अविरत गेल्या ३५ वर्षा पासून अखंड कार्य सूरू आहे.

सर्व सभासदांनी आपल्या विभागातील संचालकांशी संपर्क साधावा

सभासद के हित/उन्नती के लिये करेंगे काम सभासदोंको देंगे पूरा न्याय.

## (३) अभिनंदन

बिजली पतसंस्थेच्या चेअरमन पदी यंत्रचालक नरडाणा उपकेंद्र तथा कामगार महासंघाचे धूळे सर्कल चे सर्कल सचीव श्री दिगंबर साहेबराव भदाणे यांची बिजली कामगार पतसंस्थेचे चेअरमन तसेच श्री अनील नामदेव गायकवाड लाईनमन तथा दोंडाईचा विभागाचे अध्यक्ष यांची व्हॉ चेअरमन तसेच श्री कैलास भावसार यांची मानद सचीव पदी निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

## (४) आधी केले मग सांगितले–प्रशांत भांबुर्डेकर महावितरणचे धन्यवाद

महावितरण कंपनी मधील मुंब्रा विभागा बरोबर इतर काही विभागाचे कामगार संघटनांचा विरोध असतानाही खाजगीकरण केले गेले. हे खाजगीकरण करत असताना महावितरण कंपनीने या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना त्यांच्या इच्छित स्थळी पदस्थापना देण्याचे आश्वासन त्यावेळी दिलेले होते.

मार्च महिन्यापासून कोरोना महामारीमुळे महाराष्ट्रासह संपूर्ण देशात लॉकडाऊन लागुन गेले होते परंतु आपले महावितरणचे कर्मचारी पुर्ण जोमाने या लॉकडाऊन मध्ये काम करत होते.या कालावधीत विद्युत सहाय्यक प्रतिक्षा यादी २०१४ मधील बहुतांश विद्युत सहाय्यकांचा तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण होत होता.जस जसा व जीथे जीथे या विद्युत सहाय्याकांचा तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी पुर्ण झाला तस तसे त्यांच्या तंत्रज्ञ या पदावर सामाऊन घेण्याचे आदेशही निघत गेले,अपवाद राहीला फक्त खाजगीकरण झालेल्या विभागांचा.

खाजगीकरण झालेल्या मुंब्रा येथील विद्युत सहाय्यकांचा तीन वर्षाचा कंत्राटी कालावधी हा जुन मध्ये पुर्ण होत होता व त्याच महिन्यात त्यांच्या तंत्रज्ञ या पदावर समायोजनचे आदेश निघणे क्रमप्राप्त होते परंतु मुंब्रा (ठाणे ३) चे खाजगीकरण झाल्याने तेथील विद्युत सहाय्यकांचे तंत्रज्ञ या पदावर सामाऊन घेण्याचे आदेश कोणी काढावे याबाबत संभ्रमावस्था निर्माण झालेली होती.

आज रोजी महासंघाचे महावितरण उपाध्यक्ष श्री सुनिल कासारे व भांडुप झोन अध्यक्ष श्री रमेश नाईक ह्यांनी भांडुप झोनला जाऊन या बाबत प्रशासनाशी चर्चा केली व या विद्युत सहाय्यकांवर झालेला अन्याय त्यांच्या लक्षात आणून दिला यावेळी आनंद उमरे हा विद्युत सहाय्यक तेथे उपस्थित होता व भांडुप झोन प्रशासनाने याबाबत सात दिवसांत निर्णय घेऊ व सदर समायोजनचे आदेश पारीत करु असे तोंडी आश्वासन दिले.

यानंतर मी स्वतः ह्या विद्युत सहाय्यकांवर झालेल्या अन्यायाबाबत आजच प्रकाशगडावर जाऊन मा मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री शिवाजी इंदलकर साहेबांची प्रत्यक्ष भेट घेतली व ह्या प्रकरणाबाबत संपूर्ण माहिती दिली व या विद्युत सहाय्यकांचे तंत्रज्ञ या पदावर समायोजनचे आदेश वेळेत न निघाल्याने आत्ता नुकत्याच झालेल्या झोन आऊट बदल्यां पासूनही हे विद्युत सहाय्यक वंचित राहीले असल्याचे सुध्दा निदर्शनास आणून दिले.

मा मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री शिवाजी इंदलकर साहेबांनी लगेच याबाबत भांडुप झोन प्रशासनाशी फोनवर चर्चा करुन सदर सर्व

विद्युत सहाय्यकांचे तंत्रज्ञ या पदावर सामावून घेण्याचे आदेश तात्काळ पारीत करण्याबाबतच्या सुचना भांडुप झोन प्रशासनाला दिल्या.त्या सुचनेप्रमाणे भांडुप झोनने तात्काळ मुंब्रा येथील सर्व विद्युत सहाय्यकांचे तंत्रज्ञ या पदावर सामावून घेतल्याचे आदेश पारीत केले.

प्रकाशगडावरुन विद्युत सहाय्यकांच्या या प्रश्नांची तातडीने दखल घेऊन झालेल्या योग्य कार्यवाही मुळे मुंब्रा विभागातील सर्व विद्युत सहाय्यकांनी आनंद व्यक्त करुन महावितरण कंपनी व महासंघाचे आभार प्रकट केले.

## ( ५ ) आनंद तासंबड यांना लाड पागे समिती शिफारशींचा लाभ मिळवून दिला

नासिक- महाराष्ट्र शासन नियुक्त लाड पागे समितीने सफाई कामगारांच्या निवृत्तीनंतर त्याच्या जागी त्याच्या कायदेशीर वारसास नियुक्ती दिली जावी अशी शिफारस केली होती व शासनाने ही मान्य करून तशा संबंधित शासकीय कार्यालयांना सूचना देखील दिलेल्या आहेत परंतु आपले नियम आपणच पाळायचे नाही ही नोकरशाहीची कार्यपद्धती असल्याने नाशिक मधील श्री अशोक तासम्बड हे सफाई कामगार निवृत्त झाल्यानंतर त्यांचा पुत्र आनंद यास नोकरी देण्यात अनेक अडथळे आणले जात होते.

सेवा निवृत्त अशोक तासम्बड हे कामगार महासंघाचे निष्ठावान सदस्य असल्याने कामगार महासंघाचे नाशिक झोन सचिव श्री हर्षल काटे यांनी ह्या प्रकरणात लक्ष घातले. हा विषय त्यांना सुद्धा नवीन असल्याने त्यांनी काडके नानांच्या कानावर हा विषय घातला .कार्यकायात ह्या विषयाची चर्चा सुरू असताना असे लक्षात आले की असाच एक विषय महा पारेषण च्या नासिक झोन मध्ये कामगार महासंघाने यशस्वी रित्या मार्गी लावला आहे. त्या अनुषंगाने संदर्भासहित काडके नानांच्या मार्गदर्शनाखाली श्री काटे यानी त्वरित पत्रव्यवहार केला व सतत पाठपुरावा केला .ह्या प्रयत्नाना यश येऊन श्री तासम्बड यांचे पुत्र श्री आनंद याना कायम स्वरूपी नियुक्तीचे पत्र मिळाले व ते रुजू सुद्धा झाले

नियमांचा नीट अभ्यास करून पाठपुरावा केला तर यश मिळाल्या शिवाय राहत नाही हेच यावरून सिद्ध होते.

---

## निलंबनाचा कालावधी ९० दिवसांपेक्षा अधिक नियमबाह्य जयप्रकाश होळीकर अध्यक्ष

माननीय सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणी निकाल देताना हे स्पष्ट केले आहे की जर एखाद्या गैर कृत्याबद्दल एखाद्या कामागरास निलंबित केले असेल तर ते प्रकरण ९० दिवसांच्या आत निकाली काढून संबंधित व्यक्तीचे निलंबन मागे घ्यावे चौकशीस वेळकाढू धोरण अवलंबून ९० दिवसांपेक्षा जास्त काळ निलंबित ठेवता येणार नाही असे माननीय सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिलेले असतांना सुद्धा महावितरण कम्पनी मात्र ९० दिवसांपेक्षा जास्त काळ निलंबित ठेऊन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अनादर करीत असल्याचे कामगार महासंघाचे अध्यक्ष श्री जयप्रकाश होळीकर यांनी संचालक मानव संसाधन यांच्या निदर्शनास एका पत्राद्वारे आणून दिले आहे

आपल्या पत्रात श्री होळीकर यांनी हे सुद्धा स्पष्ट केले आहे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा मान फिल्ड ऑफिस मध्ये राखला जातो पण ज्या प्रकरणांवर सांघिक कार्यालयाने निर्णय घ्यावयाचा आहे तिथे मात्र ह्या निर्णयाचे पालन होत नाही अनेक कामगार चौकशी पूर्ण झाल्यानंतर सुद्धा केवल ह्यासाठी अजूनही निलंबित आहेत की ज्यांचे प्रकरणी सांघिक कार्यालयाने निर्णय घेतलेला नाही

श्री होळीकर यांनी हेतुतः कामगारांना दिल्या जाणाऱ्या त्रासाबद्दल आपल्या पत्रात तीव्र नाराजी व्यक्त केली असून मुख्य कार्यालयात प्रलंबित असलेली सर्व प्रकरणे तातडीने निकाली काढण्याची विनंती केली आहे. त्यांनी हे देखील सूचित केले आहे की जर आमच्या विनंतिकडे दुर्लक्ष झाले तर ह्या विषयासाठी आंदोलन छेडले जाईल व तशी वेळ व्यवस्थापणाने आमच्यावर आणू नये अशी विनंती केली आहे.

## कोविड १९ पीडितांना विशेष रजा मिळावी

**– शंकर पहाडे महामंत्री**

विद्युत कंपन्यांमध्ये कार्यरत कामगार किंवा अधिकारी जर दुर्दैवाने कोरोना ह्या आजाराने संक्रमित झाले तर त्यांच्या उपचाराचा कालावधी व नंतरचा अत्यावश्यक असा विलगिकरन कालावधी हा संबंधित कामगार /अधिकारी कामावर आहे असे समजण्यात यावा अर्थात ह्या आजाराची संबंधीतास विशेष रजा मिळावी अशी मागणी कामगार महासंघाचे महामंत्री शंकरराव पहाडे यांनी एक पत्र पाठवून केली आहे

याबाबत श्री पहाडे यांनी लाकडाऊन च्या काळातील परिपत्रकाचा संदर्भ दिला असून त्या परिपत्रकात दिलेल्या सुविधा ह्या कायम ठेवण्यात याव्यात अशी विनंती केली आहे

ह्या आजाराचे संक्रमण हे बाधित व्यक्तीच्या संपर्कात आल्यामुळे होते व कामावर असताना विविध लोकांच्या संपर्कात येणे टाळता येत नाही व त्यात जर कोणी बाधित असेल तर कामगार किंवा अधिकारी सुद्धा बाधित होत असल्याने हा आजार अन्य आजारांपेक्षा वेगळा व अधिक धोकेदायक मानून ही तरतूद करावी या हेतूने महामंत्री श्री पहाडे यांनी ऊर्जा मंत्री श्री नितिन राऊत यांना पत्र पाठवून ही मागणी केली आहे कामगार मागसंघाच्या ह्या मागणीचे सर्वत्र स्वागत होत आहे

# राऊत X रनौत एक शो मॅच




**– विलास झोडगेकर**

सर्व जग हे कोरोनाग्रस्त असल्याने सर्वत्र लॉकडाऊन आहे. स्वाभाविकच याचा फटका सर्व क्षेत्राला बसला आहे क्रीडा क्षेत्र सुद्धा याला अपवाद नाही. विम्बल्डन, आयपीएल, फुटबॉल, प्रो कबड्डी इत्यादी सर्व खेळ ज्यांना तुफान प्रेक्षकवर्ग लाभतो ते सध्या बंद असल्याने एका मोठ्या करमणुकीच्या साधनाला जग मुकले आहे. सर्व जुन्या सिरीयल पाहून झाल्या, गाणे ऐकून झाले, युट्युब खंगाळुन खंगाळून आपल्या अभिरुचीनुसार भाऊ तोरसेकर, हेमंत देसाई, निखिल वागळे कंटाळा येईपर्यंत ऐकून झाले. राजीव खांडेकर, प्रसन्न जोशी, आशिष जाधव यांचे प्रायोजित कार्यक्रम बघून झाले, अर्णवचा आरडा-ओरडा नेशन वांट्स टू नो ऐकून कान किटले! क्रीडाप्रेमींना थरारक असा लाईव्ह शो हवा होता, तो त्यांना ऐकायला किंवा बघायला मिळत नसल्याने जाम वैतागले होते. प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर क्रीडाप्रेमींची भरपूर करमणूक करणारा लाईव्ह शो बघायला मिळाला.

निमित्त झालं ते सुशांत सिंग राजपूत यांच्या आत्महत्येचं! खरंतर आत्महत्या काय महाराष्ट्राला नवीन आहेत? दररोज ५/६ शेतकरी आत्महत्या करतात, ८/१० दिवसांतून एखादा सेलिब्रेटी आत्महत्या करतो, महिन्यातून किमान एकतरी प्रेमभंग झालेला किंवा झालेली आत्महत्या होते, याशिवाय मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून किंवा मनपसंत सीरिअल पाहू देत नाही म्हणूनसुद्धा ह्या देशात आत्महत्या होतात. याखेरीज सिझनल म्हणजे परीक्षेत नापास किंवा अपेक्षेप्रमाणे गुण मिळाले नाही म्हणून अशा तद्दन फालतू कारणासाठी आत्महत्या करणारे कमी नाहीत. पण ह्या सर्व आत्महत्येची केवळ १०/२० सेकंदांची बातमी असते. त्यावर चर्चा होत नाही किंवा ती आत्महत्या राजकीय चर्चेचा विषय होत नाही, कारण कुठला विषय सोडून द्यायचा व कुठला लावून धरायचा हे मीडिया ठरवत असतो. मराठी मीडियाने विशेषतः झी २४ तासने हा विषय सतत जिवंत ठेवला. असा एकच विषय जिवंत ठेवण्यात मीडियाला काय स्वारस्य होते याचीसुद्धा सीबीआय चौकशी झाली पाहिजे. कारण जोपर्यंत विषय जिवंत ठेवण्यासाठी कोणी प्रायोजक मिळत नाही, तोपर्यंत मीडियाला काही देणे घेणे नसते. मीडिया एकतर TRP बघते नाहीतर प्रायोजक! ते काहीही असो सुशांतची आत्महत्या जवळपास तीन महिन्यांपासून प्राईम टाइमला आहे.

सुशांतच्या आत्महत्येची सीबीआय चौकशी झाली पाहिजे. ही आत्महत्या नसून हत्या आहे, असा सर्वप्रथम सूर लावला तो कंगना रनौत यांनी!! आणि मग त्यांचे ह्या आत्महत्येबद्दल दररोज नवीन ट्विट येऊ लागले! अप्रत्यक्षरीत्या महाराष्ट्र सरकारवर टीका होऊ लागली. त्यांच्या ट्विटमुळे मीडियाला दररोज चमचमीत खाद्य मिळू लागले. आधीपासूनच ह्या विषयात जरुरीपेक्षा जास्त रस घेणाऱ्या मीडियाने हाच विषय प्राईम विषय बनवला. कंगना रनौत यांच्या ट्विटला केंद्रस्थानी ठेवून चर्चा होऊ लागल्याने प्रसिद्धी माध्यमांचे लक्ष वेधून घेण्यात तरबेज असलेल्या रनौत ह्या जवळजवळ महिनाभर स्वतःला केंद्रस्थानी ठेवण्यात यशस्वी झाल्या!

खरंतर कंगना रनौत यांनी फक्त सीबीआय तपासाची मागणी केली होती. त्यांचा निदान प्रारंभी तरी सर्व रोख हा बॉलीवूडमधील घराणेशाहीच्या विरोधात होता व सुशांत हा ह्या घराणेशाहीचा बळी आहे असे त्यांच्या ट्विटमधून निष्पन्न होत होते. कंगना यांचा हा कार्यक्रम एकपात्री प्रयोगासारखा होता. कोणी जर त्याकडे लक्ष दिले नसते तर काही प्रयोगानंतर तो खेळ बंद पडला असता. परंतु दररोज स्वतःला प्राईम टाइममध्ये बघण्याची सवय झालेल्या व ह्या खेळात अजून तरी अजेय असलेल्या राऊत यांनी यात उडी घेऊन कंगना रनौत यांचे व पर्यायाने मीडियाचे आपल्याकडे लक्ष वेधण्याचा सफल प्रयत्न केला व आतापर्यंत जे एकतर्फी युद्धाचे प्रात्यक्षिक सुरू होते त्याची जागा द्वंद्व युद्धाने घेतली व निकराचा संग्राम सुरू झाला. लाईव्ह मॅचच्या प्रतीक्षेत असलेल्या क्रीडाप्रेमींची प्रतीक्षा संपली होती.

गेल्या ८/९ महिन्यांपासून आपला अनुभव असा आहे की, राऊत यांना कोणीही अंगावर घेत नाही. एकतर सर्वजण गप्प राहणे पसंत करतात किंवा त्यांच्या सुरात सूर मिसळतात. त्यामुळे काय बोलायचे ते मुंबईत येऊन बोला असा इशारेवजा दम देणाऱ्या ट्विटने श्री. राऊत यांनी ह्या खेळात प्रवेश केल्यावर आता कंगना माघार घेणार असाच सार्वत्रिक समज होता. कारण गेल्या काही महिन्यांपासून श्री. राऊत यांनी फडणविसांपासून मोदींपर्यंत सर्वांवर कारण अकारण

टीका केली संविधानिक पद असलेले राज्यपाल यांच्यावरसुद्धा त्यांनी टीका केली. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी ह्या करीम लालाला भेटत असत व मी म्हणजे ते स्वतः दाऊदला अनेकदा भेटले आहेत व त्याला चांगला दम दिलेला आहे, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले आहे. पण ते कधीही अडचणीत आले नाहीत किंवा त्यांना कोणी जाब विचारलेला नाही. उलट प्रत्येक वादानंतर ते अधिक मजबूत झालेले आहेत. त्यामुळे राऊतांपुढे रनौतांचा काय पाडाव लागणार असेच सर्वांना वाटत होते पण तसे झाले नाही. हे ट्विटर युद्ध तासातासाला अधिक रंजक होत गेले. कंगणाने काय बोलायचे ते मुंबईत येऊन बोलावे अशा दमबाजीला मुंबई म्हणजे पीओके नाही असा टोला कंगणाने लगावला. कंगनाकडून अशा एखाद्या शब्दाची राऊत व मीडिया वाटच पहात होते. लगेच इकडचा तिकडचा संदर्भ न देता कंगणाने मुंबईची तुलना पीओकेशी केली, असा कांगावा सुरू झाला आणि मग नेहेमीप्रमाणे यात अनेकांनी उडी घेत कंगणाला महाराष्ट्र द्रोही ठरवून मुंबईचा व १०५ हुतात्म्यांचा अपमान केल्याचा शिक्का मारला. ज्यांच्यावर राज्यातील जनतेच्या सुरक्षिततेची संविधानिक जबाबदारी आहे त्या गृहमंत्री अनिल देशमुख यांनीसुद्धा तिला मुंबईत सुरक्षीत वाटत नसेल मुंबई सोडावी असे वक्तव्य केले. खरंतर हे वक्तव्यसुद्धा राज्यपालांच्या हस्तक्षेपासाठी पुरेसे होते. परंतु राज्यपालांनी संयम ढळू दिला नाही कंगनाने ह्या टीकेला उत्तर देतांना मनकरणीका महाराष्ट्राची असतानासुद्धा तिच्यावर सिनेमा आपण काढला व मनकर्णीकेची अर्थात झाशीच्या राणीची भूमिका आपण वठवली. त्यामुळे मला कोणी महाराष्ट्र प्रेम शिकवू नये अशा आशयाचे ट्विट करून मी अमुक तारखेला मुंबईत येत आहे हिंमत असेल तर मला रोखून दाखवावे असे आव्हान दिले.

आता हा खेळ मिक्स सिंगल न राहता सर्वांसाठी खुला झाला. मुंबईच्या महापौरांनी लगेच जाहीर करून टाकले की कंगना मुंबईत आल्यास तिला क्वारन्टाईन केले जाईल. बिहारच्या पोलीस अधिकाऱ्यांना क्वारन्टीन केल्यापासून त्यांना असा इशारा देण्याचा शोकच जडला आहे. दुसऱ्या एका नेत्याने ती मुंबईत आल्यास आमच्या रणरागिणी तिचे थोबाड रंगवतील, असा इशारा दिला व लगेच जागोजागी रणरागिणींकडून कंगणांच्या फोटोंचे थोबाड रंगवण्यास सुरवात झाली. ह्या प्रकाराने जराही न डगमगता कंगणाने केंद्र सरकारकडे सुरक्षा मागितली व अशा मागणीची जणू काही केंद्र वाटच पाहत होते. इतक्या तातडीने ही सुरक्षा पुरवली गेली. आता आपण तिचे काहीच करू शकत नाही ह्यामुळे निराश झालेल्या सत्ताधाऱ्यांना अचानक तिचे ऑफिसचे बांधकाम अनधिकृत असल्याचे आठवले आणि ती मुंबईत नसताना ह्या सर्वशक्तिमान महापालिकेने ते पाडले. ह्या कृतीवर हायकोर्टाने कडक ताशेरे ओढीत जैसे थे परिस्थिती ठेवायचे आदेश दिले.

Y प्लस सुरक्षा घेऊन कंगना मुंबईत आल्या, कोणी त्यांना हात लावू शकले नाही, क्वारणटाईन करू शकले नाही, उलट तिनेच ट्विट केले तुने मेरा ऑफिस तोडा मै तेरा घमंड तोडूगी. अनेक वेडेवाकडे ट्विट करीत कंगना रनौत आपल्या गृह राज्यात पोहोचल्या व तिथे गेल्यावर मुंबईला पाकिस्तानची उपमा दिली. यांवरही चिक्कार वादंग झाले. पण दरम्यानच्या काळात एक कार्टून फॉरवर्ड केल्याबद्दल शिवसैनिकांनी एका निवृत्त नौदल अधिकाऱ्याला घरातून बाहेर काढून मारहाण केली. हे प्रकरण शिवसैनिक समजतात तेवढे साधे नाही. स्वतः संरक्षणमंत्री श्री. राजनाथ सिंग यांनी त्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कडक कारवाईचे संकेत दिले आहेत. संजय राऊत यांनी नेहेमीप्रमाणे यावरही राजनाथ यांच्यावर टीका केली. त्यामुळे सर्व निवृत्त सैनिक जाम भडकले आहेत व त्यांनी हा विषय थेट राष्ट्रपतीकडे नेला आहे. तसेच ज्यांना मारहाण झाली ते श्री. मदन शर्मासुद्धा इरेला पेटले आहेत. त्यामुळे हा पराक्रम महागात पडेल असे वाटते त्यामुळे शर्मा यांनी कंगणांच्या मुंबई ही पीओके नव्हे तर पाकिस्तान आहे ह्या म्हणण्याचे समर्थन केले हे चांगले लक्षण नाही. शर्मा हे नाव मराठी नसल्यामुळे त्यांना राऊत साहेब महाराष्ट्र द्वेष्टे ठरवतील यात शंका नाही. ह्या व्यतिरिक्त त्यांना भाजपचे हस्तक ठरवणेसुद्धा खूप सोपे आहे आणि एकदा त्यांना भाजपचे हस्तक असे घोषित केले की लगेच महाविकास आघाडीतील तिन्ही पक्ष शर्मांवर तुटून पडलेच म्हणून समजा.

थोडक्यात काय राऊत राणावत सामना हा दोघांनीही टाकलेल्या नो बॉलमुळेच गाजला. फरक एवढाच की राऊत यांनी टाकलेल्या नो बॉलकडे अंपायरने म्हणजे मीडियाने दुर्लक्ष केले. परंतु कंगणाचे मात्र अगदी डोळे झाकून नो बॉल ठरवले एवढेच नव्हे तर दंड म्हणून राऊत यांना फ्री हिट दिली व त्याचा राऊत यांनी पुरेपूर लाभ उठवला.

सर्वांनी हे लक्षात घ्यावे की ही निव्वळ शो मॅच होती. त्यातून ना महाराष्ट्राचे काही भले बुरे होणार होते, ना सुशांत आत्महत्येच्या चौकशीला काही गती मिळणार होती. हा कंगणाला आपले ऑफिस गमवावे लागले. परंतु ते आज ना उद्या पडणारच होते. त्या बदल्यात कंगणाला स्वैर टीका करण्याची संधी मिळाली व त्यांनीसुद्धा मिळालेल्या संधीचा भरपूर लाभ उठवला. थोडक्यात काय तर दोन हौशी कलाकारांनी केलेले हे मनोरंजन होते.

हे युद्ध आणखी काही काळ चालू राहील व आपोआप बंद होईल ह्या असल्या नुरा कुस्तीकडे दोन घटका करमणूक म्हणून पहाणेच इष्ट ठरेल. कोणीच कोणाची बाजू घेऊ नये. हाच बोध घ्यावा.

# अन्य प्रदेशोंकी गतीविधिया

## (१) राजस्थान

जोधपुर विद्युत वितरण निगम श्रमिक संघ द्वारा निजी करण, एफ आर टी ठेका प्रथा, रीडिंग, बिलिंग, एमबीसी एवं डिस्काम स्तरीय २५ सूत्री मांग पत्र के निस्तारण के लिये जोधपुर डिस्कॉम के जोधपुर जिला बीकानेर, चूरु, गंगानगर, जैसलमेर, बाड़मेर, जालौर, पाली, जोधपुर शहर आदि स्थानों पर अधीक्षक अभियंता कार्यालय पर विरोध प्रदर्शन कर प्रबंध निदेशक महोदय को ज्ञापन भिजवाए गए तथा इसी क्रम में सिरोही जिले के माउंट आबू, आबूरोड शहर, रेवदर, आबूरोड ग्रामीण,सरूपगंज ,पिंडवाडा ,सिरोहीशहर, शिवगंज, जावाल कालन्द्री ही जिले के सभी उपखंडों पर सहायक अभियंता कार्यालय में विरोध प्रदर्शन कर ज्ञापन एमडी को भिजवाया गया.

## (२) महामंत्री अमर सिंह सांखला जी का निवेदन

समस्त पदाधिकारी/प्रदेश महामंत्री गण,

नमस्कार,

आप सभी कोविड़ १९ संक्रमण काल में पूर्ण सावधानी के साथ कुशल पूर्वक होंगे ।

जैसा कि आप सभी ने अपने अपने प्रदेशो में विद्युत एवं परिवहन के साथ मिलकर २४ से ३० जुलाई तक धरना/प्रदर्शन/रैली के माध्यम से जिलाधीश को केन्द्र सरकार के लिए ज्ञापन सौंपा है । कुछ प्रदेशो से उनके कितने जिलों में कितने कार्यकर्ताओं कि उपस्थिति में कैसा कार्यक्रम हुआ इसकी अभी भी जानकारी प्राप्त नहीं हो सकी है अतः आज दोपहर तक इसकी जानकारी देने का कष्ट करेंगे।

भामसं द्वारा अगस्त माह के ११ से १७ अगस्त २०२० तक वर्चुअल माध्यम से विभिन्न विषयों पर वर्चुअल क्लास आयोजित किया गया था जिसका लिंक आप सभी को प्रेषित किया गया था, कृपया कितने विषय पर आप सम्मिलित हुए इसकी भी जानकारी आज शाम तक भेजने का कष्ट करेंगे ।

इसके अतिरिक्त आपके प्रदेश में कोई अन्य कार्यक्रम हुए हो तो इसकी भी जानकारी प्रदान करेंगे।

जैसा कि आप सभी को आज ६ सितम्बर शाम ४.३० बजे से ५.३० बजे जिओ मीट प्लेटफॉर्म पर पदाधिकारी बैठक की सूचना राष्ट्रीय संगठन मंत्री श्री विलास जी द्वारा सूचना प्रेषित किया गया है । इस बैठक में ४.३० बजे से लगभग २० मिनट के लिए भामस के राष्ट्रीय महामंत्री श्री विरजेश उपाध्याय जी भी उपस्थित रहकर मार्गदर्शन करेंगे । इसलिए आप सभी से निवेदन है कि बैठक समय से कम से कम १५ मिनट पहले जुड़ने का कष्ट करेंगे ।

जैसा सूचित किया था उसके अनुसार अखिल भारतीय विद्युत मजदूर महासघ पदाधिकारी बैठक मे भाम संघ के राष्ट्रीय महामंत्री माननीय विरजेश जी प्रारंम्भीक सत्र मे उपस्थित रहे और उन्होंने आगामी रणनीती से पदाधिकारियोको अवगत कराया जिसे उन्होने फेज २ नाम दिया. उनके संबोधन के बाद अन्य विषयोपर चर्चा हुई जीसमे विगत दो माहमे हुए आंदोलन का विषय प्रमुखता से था मा. अख्तर जी के मार्गदर्शन से बैठक का समापन हुआ

अमर सिंह सांखला

राष्ट्रीय महामंत्री

## (३) अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघ बैठक

२० सितम्बर २०२० अभावि मजदूर महासंघ

परामर्षदात्री समिती की व्हीडीओ कॉन्फरन्स बैठक दिनांक २० सितम्बर को संपन्न हुई. मुरली कृष्णन जी की अध्यक्षतांमे संपन्न हुई इस बैठक मे मा. अख्तर हुसेन जी, अमर सिंह सांखला जी, कटकवार जी, अरुण देवांगन जी, गढवी जी, मुळगूंद जी, सुभाष जी लोंढे, विलास जी उपस्थित थे।

सर्वप्रथम बाळासाहेब साठे जी को उनके स्मृतिदिन के उपलक्षमे श्रद्धांजली अर्पित की गयी अख्तर जी, विलास जी तथा अमर सिंह जी ने उनके बारेमे अपने अनुभव कथन किये बादमे कोरोना को मात देके स्वस्थ हुए मुरली जी को सबने बधाई दी और हरदास जी, धामणकर जिनका पुरा परिवार कोरोना पॉझिटिव्ह पाया गया और फिलहाल जो होम क्वारणटाईन है उनके शीघ्र स्वास्थ्य की प्रार्थना की और नजदिक के काल जो दिवंगत हुए उन्हे श्रद्धांजली अर्पित की गयी।


भारतीय मजदूर संघ के आगामी अधिवेशन के बारेमे अख्तर जी और सांखला जी ने जानकारी दी और उसके बाद संघटनात्मक मामले मे विस्तार से चर्चा हुई जीसमे सभी सदस्योने भाग लिया मा. अखतर जी ने चर्चा का समापन किया।

मुरली कृष्णन जी ने बैठक का समापन करते हुए बैठकके कार्यवाहिपर संतोष व्यक्त किया और संक्षेप मे मार्गदर्शन किया

सांखला जी धन्यवाद प्रेषित किया लगभग ढाई घंटा चली ये बैठक बहुत फलदायी रही ।

# अन्य प्रदेशोंकी गतीविधिया






# अभिष्टचिंतन

**गेल्या काही दिवसांत महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या अनेक जेष्ठांनी आपल्या वयाची ७०-७५ वर्षे पूर्ण केली. अशा सर्वांचे आम्ही आपल्या वतीने अभिष्टचिंतन करीत असून, निरामय भावी आयुष्यासाठी भरपूर शुभेच्छा देत आहोत, तसेच त्यांच्या कार्याचा अल्प शब्दांत आढावादेखील घेत आहोत.** - विलास झोडगेकर

## नाबाद ७०

## १) व्ही के (वसंत) बापट नासिक २७ एप्रिल



नाशिक झोनमधील निष्ठावान सक्रिय कार्यकर्ते श्री. वसंत बापट यांनी २७ एप्रिल २०२० रोजी आपल्या वयाची ७० वर्षे पूर्ण करून ७१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. श्री. बापट हे अगदी त्यांच्या सेवेच्या प्रारंभापासून कामगार महासंघाशी जोडले गेलेले आहेत व निवृत्त होऊन १२ वर्षे झाली, तरी महासंघ व मजदूर संकेतशी त्यांची नाळ जुळलेली आहे.

उत्तम व्यक्तिमत्व व सतत काहीतरी नवे करण्याची ओढ हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. वसंत बापट हे नाव तसे वलयांकित आहे. स्वातंत्र्य चळवळीतील मोठे नाव आणि संयुक्त महाराष्ट्रासाठी जो मोठा संघर्ष झाला तो आपल्या वीरश्रीपूर्ण कवितांनी गाजवलेल्या व्यक्तींची नावेसुद्धा वसंत बापटच होती. त्यामुळे त्यांच्या नावाभोवतीच एक प्रकारचे वलय आहे व बापट यांनी आपल्या संघटनात्मक कामाने हे वलय कायम ठेवले आहे.

बापट यांच्या संघटनात्मक कामाचा प्रारंभच मुळी ग्रामीण भागातून झाला. नाशिक सर्कलच्या मनमाड, चांदवड, मालेगाव, कळवण आदी ग्रामीण भागांत ते कार्यरत होते व त्या ठिकाणी त्यांनी कामगार संघ रुजवला यथावकाश ते नाशिक शहरात बदलून आले व मुख्य प्रवाहात सामील झाले ते मनमाडला असताना बाळासाहेब साठे मराठवाडा दौऱ्यावर जात असताना त्यांच्या अतिथ्याची जबाबदारी मी श्री. बापट यांच्यावर सोपवली होती. बापट यांच्या आईचे ते लहान असतानाच निधन झालेले असल्याने ते स्वतःच स्वयंपाक करायचे. बाळासाहेबांना सुद्धा त्यांनी स्वहस्ते स्वयंपाक बनवून जेवू घातले. त्यांच्या पाक कलेचे बाळासाहेबांनी खूप कौतुक केले होते.

माझ्या सेवेच्या अखेरच्या टप्प्यात आम्हा दोघांना एकत्र काम करण्याची संधी प्राप्त झाली व निष्ठावान कार्यकर्ता म्हणून ओळख असलेले श्री. बापट एक विश्वासू सहकारी आहेत हेसुद्धा माझ्या लक्षात आले.

मंडळाच्या सेवेतून अकौंटस ऑफिसर ह्या पदावरून ते २००८ मध्ये निवृत्त झाले व मजदूर संकेतच्या निमित्ताने संपर्क कायम ठेवला. सध्या ते निवृत्त संघटनेचे काम करतात. प्रकृती उत्तम आहे कारण सर्वच बाबतीत काटेकोरपणा आहे. कौटुंबिक सर्व जबाबदाऱ्या सेवा काळातच पूर्ण झालेल्या आहेत. समाजकार्याची आवड आहे त्यामुळे यापुढेही ते सक्रिय कार्यकर्ते राहतील याची खात्री आहे. त्यांना खूप खूप शुभेच्छा !!!

## २) बाबुराव शिंदे, औरंगाबाद १६ एप्रिल



महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे जुने जाणते निष्ठावान कार्यकर्ते व महावितरण कामगार महासंघाचे कोषाध्यक्ष श्री. बाबुराव शिंदे यांनी दिनांक १६ एप्रिल रोजी वयाची ७० वर्षे पूर्ण करून ७१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. अभिनंदन व शुभेच्छा.

बाबुराव शिंदे हे एक अजब रसायन आहे. मराठवाड्यात इतके प्रदीर्घ काळ केंद्रस्थानी आणि तेही सर्वांच्या पसंतीचे असणे सोपी गोष्ट नाही. मी मराठवाड्याचा अनेक वर्षे पालक राहिलेलो असल्याने मला मराठवाड्याचा डीएनए चांगला माहिती आहे. फार काळ कोणाला महत्व देणे मराठवाड्याच्या स्वभावाला सूट होत नाही पण बाबुराव मात्र ह्या सिद्धांताला अपवाद ठरले आहेत. कारण त्यांचा स्वभाव संघटनेसाठी पडते घेण्याची तयारी आणि कशाचाही इगो नाही आणि कायम संघटनेच्या हिताचीच भूमिका. व्यक्तिप्रेम किंवा व्यक्ती द्वेष अजिबात नाही. पारदर्शी स्वभाव आत एक बाहेर दुसरेच अशी प्रवृत्ती नाही आणि त्यामुळे कोणतीही महत्वाची जबाबदारी देण्याची चर्चा होते त्यावेळी सर्वानुमते बाबुराव यांच्या नावावर शिक्कामोर्तब होते. एखाद्या व्यक्तीने इतकी वर्षे विश्वासार्हता टिकवून ठेवणे ही साधी गोष्ट नाही. पण बाबूरावांना मात्र हे शक्य झाले आहे. त्यामुळेच कामगार महासंघ असो, निवृत्त कामगार संघ असो की कामगार कल्याण निधी असो पहिली पसंती बाबुराव असते.

नीटनेटके राहणे हेसुद्धा त्यांचे ठळक वैशिष्ट्य आहे. शर्ट-पॅन्ट एकदम म्याचिंग असते. त्यांना केव्हाही बघा एकदम फ्रेश असतात. लांबचा प्रवास करून आलेले असो की प्रवासाला निघत असो बाबुराव एकदम फ्रेश. त्यामुळे त्यांच्या सहवासात असलेली व्यक्तीसुद्धा फ्रेश असते. बाबुराव हे खऱ्या अर्थाने अजातशत्रू व्यक्तिमत्व आहे.

त्यांचा आणि माझा खूप जुना परिचय आहे. मी मराठवाड्याचा पालकमंत्री झाल्यावर माझे वारंवार औरंगाबादला जाणे व्हायचे बऱ्याचदा तेसुद्धा दौऱ्यात सहभागी होत असल्याने परिचय वाढला व त्याचे मैत्रीत रुपांतर झाले. प्रत्यक्ष भेट जरी आता कमी होत असली तरी फोनवर सतत संपर्क असतो. काही काम नसले तरी केवळ संपर्क म्हणून ते अनेकदा मला फोन करतात. पारिवारिक समस्यांपासून ते मुक्त नाहीत, परंतु त्याचा परिणाम कधीही संघटनेच्या कामावर होत नाही. कारण त्यांनी नेहेमीच प्राधान्य संघटनेला दिले आहे. अशा संघटनप्रिय बाबुराव शिंदे यांना अनंत शुभेच्छा.

## ३) श्री प्रकाश आहेर, नासिक - २ सप्टेंबर



नाशिक झोनमधील महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे धडाडीचे निष्ठावान कार्यकर्ते श्री. प्रकाश आहेर यांनी दिनांक २ सप्टेंबर रोजी वयाची ७० वर्षे पूर्ण करून ७१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. अभिनंदन व भरपूर शुभेच्छा.

मूळचे शिवसैनिक असलेले श्री. आहेर हे प्रथम अन्य संघटनेचे सभासद होते. परंतु नाशिक ग्रामीण विभागाचे तत्कालीन सचिव स्वर्गीय अशोक अहिरराव यांच्या प्रभावी कार्यपद्धतीमुळे आकर्षित होऊन त्यांनी कामगार महासंघाचे सदस्यत्व स्वीकारले व नंतर त्यांनी मागे वळून बघितले नाही. अखेरपर्यंत ते कामगार संघाशी निष्ठावान राहिले इतकेच नव्हे तर अनेक कामगारांना कामगार महासंघाशी जोडले. हे मुद्दाम सांगण्याचे कारण असे की ज्यांच्यामुळे प्रभावित होऊन ते कामगार संघात आले होते ते श्री. अशोक अहिरराव कालांतराने अन्य संघटनेत गेले. परंतु दबाव असतानासुद्धा श्री. प्रकाश आहेर यांनी संघटना सोडली नाही.

विभागीय सचिव, सर्कल सचिव, झोनल संघटक अशी विविध पदे त्यांनी भूषवली व आपला ठसा उमटवला. कंपनिकरणानंतर ते नाशिकच्या पारेषण झोनमध्ये गेले. त्यावेळी सुनील सोमवंशीसुद्धा नाशिक पारेषणला होते. ह्या दोघांनी खूप मेहनत घेऊन ह्या नवीन कंपनीत कामगार महासंघ भक्कम केला. कार्यालयीन कामातसुद्धा श्री. आहेर हे निपुण होते व सचोटीने काम करणारे होते. त्यांची प्रतिमा स्वच्छ असल्याने व्यवस्थापनावर सुद्धा त्यांचा दबाव असे. सध्याची नाशिक पतसंस्था स्थापन करण्यात त्यांची महत्वाची भूमिका होती व प्रथम संचालक मंडळाचे ते सदस्य होते. ते सर्कल सेक्रेटरी असतानाच नाशिक पतसंस्थेच्या स्वतःच्या कार्यालयाचे उद्घाटन झाले व ह्या कार्यक्रमाला स्वर्गीय रमण भाई शहा, अखतर हुसेन, एस. एन. देशपांडे, हरदासजी आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. नाशिक पतसंस्थेच्या उत्कर्षात त्यांचे योगदान मोठे आहे.

महापारेषणच्या नासिक झोनमधून लेखाधिकारी ह्या पदावरून २०१० साली ते निवृत्त झाले. सध्या त्यांची तब्येत त्यांना फारशी साथ देत नाही. त्यामुळे नियमित संपर्क कमी झाला आहे. अर्थात नैमित्तिक संपर्क असतोच. सेवानिवृत्त होऊन १० वर्षे झाली, तरीसुद्धा पारेषण झोनमधील अनेक कार्यकर्ते त्यांचेकडून मार्गदर्शन घेऊन काम करतात. एकूणच त्यांचे योगदान आजसुद्धा प्राप्त होत आहे. त्यांना खूप-खूप शुभेच्छा.

## ४) श्री. राम पांडे, अमरावती १९ सप्टेंबर



राम पांडे शब्द उच्चारल्यावर हसतमुख चेहऱ्याची प्रतिमा डोळ्यापुढे उभी राहाते. मी त्यांना कधीही दुरमुखलेल्या चेहऱ्याचे बघितलेले नाही.

श्री. राम पांडे म्हटल्यावर भांडार विभाग डोळ्यापुढे उभा राहतो. ते भांडार विभागाशी इतके एकरूप होते की, कंपनिकरणानंतर भांडार विभागाचे स्वतंत्र अस्तित्व संपुष्टात आले तरी राम पांडे यांनी मात्र स्वतःची ओळख भांडार विभागाशी निगडित अशीच ठेवली. त्यांच्या सेवेचा बहुसंख्य काळ हा भांडार विभागातच गेला. १९६८ साली वीज मंडळाने टाटा समितीचा अहवाल स्वीकारून स्वतंत्र भांडार विभागाची निर्मिती केली. हेड ऑफिस ते फिल्ड ऑफिस असा जवळपास स्वायत्त असा विभाग अस्तित्वात आला. ही नवीन रचना अभियंता पूरक होती व आतापर्यंत जे काम क्लेरीकल संवर्गातील कर्मचारी/अधिकारी करीत होते, त्या पदांवर अभियंत्यांची नियुक्ती होणार असल्याने मोठा संघर्ष उभा राहिला व ह्या संघर्षाचे नेतृत्व प्रारंभापासून भांडार विभागात कार्यरत मा. अण्णा देसाई यांनी केले. खूप युनियनबाजी झाली. तत्कालीन नोकर संघाचा अण्णांना विरोध होता. परंतु भांडार विभागातील सर्वसामान्य कामगार अण्णा यांना मानणारा असल्याने भांडार विभाग हा कामगार महासंघाचे शक्ती केंद्र बनला. आर. टी. जोशी, शहापुरकर, राम पांडे, वडगावकर, भट आदी अनेक दिग्गज भांडार विभागातूनच पुढे आले. भांडार विभागाच्या दरवर्षी होणाऱ्या स्वतंत्र मेळाव्यातून श्री. राम पांडे यांचे नेतृत्व विकसित होत गेले. बहुतेक मेळाव्याचे नियोजनाचे ते प्रमुख असत.

ते एक उत्कृष्ठ वार्तांकार आहेत. अभ्यासूपणे विषयाची मांडणी करणे, आपला मुद्दा लावून धरणे व वेळप्रसंगी आक्रमक होणं हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. अमरावती येथील अधिवेशन यशस्वी करण्यात त्यांचे योगदान मोठे होते. श्री. बर्वे, मोरोणे, भुसारी, पांडे या अमरावतीच्या श्रेष्ठ कार्यकर्त्यांनी उत्कृष्ठ समन्वयाचा नमुनाच यावेळी पेश केला होता. अमरावतीच्या पतसंस्थेच्या उभारणीत व नंतरच्या वाटचालीत सुद्धा त्यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांच्या पूर्ण परिवाराशी माझे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. ह्या आनंदी परिवारास खूप शुभेच्छा.

## ५) श्री गजानन नेवाळे नागपूर १५ सप्टेंबर



माझे अतिशय जिवलग मित्र व वीज कामगार महासंघांचे निष्ठावान कार्यकर्ते श्री. गजानन नेवाळे यांनी १५ सप्टेंबर रोजी आपल्या वयाची ७० वर्षे पूर्ण करून ७१ व्या वर्षात प्रवेश केला. त्यांचे अभिनंदन व खूप शुभेच्छा.

श्री. नेवाळे यांच्या सेवेचा प्रारंभ नाशिक येथून झाला. नाशिकच्या मेजर स्टोअर्समध्ये ते एलडीसी म्हणून रुजू झाले. मी सुभाष लोंढे, सुभाष भावसार, आर. डी. भट, सौ. सुमेधा वैद्य असे सारेजण त्यावेळी म्हणजे साधारणतः १९६९/७० ला मेजर स्टोअर्समध्येच कामाला होते. गजानन आमच्यापेक्षा थोडा लहान होता. पण तसे समवयस्क असल्याने मी सुभाष व गजानन यांची खूप मैत्री होती. त्या मैत्रीला त्यावेळी संघटनेचा पदर नव्हता. कारण मी आणि सुभाष कामगार संघाचे साधे सभासद होतो. नेवाळे कोणत्याच संघटनेचे सभासद झालेले नव्हते. त्यांचे मेव्हणे हे नोकर संघाचे कार्यकर्ते होते व एका अर्थाने नाशिक येथील त्यांचे पालक पण होते. त्यामुळे त्यांची द्विधा मनस्थिती असणे स्वाभाविक होते. पण शेवटी त्यांनी कामगार संघाचे सदस्यत्व

स्वीकारले व पुढे जाऊन अतिशय क्रियाशील पदाधिकारी झाले.


गजानन आणि मी पारिवारिक मित्र आहोत. मी व सुभाष त्यांच्या विवाहाला उपस्थित होतो व त्यांच्या मुलीच्या विवाहाला तर मी सुभाष व भट सपत्नीक उपास्थित होतो. खरं तर मी आम्ही कुठेच सपत्नीक गेलेलो नाही. पण गजानन त्याला अपवाद ठरला. अर्थात तोसुद्धा माझ्या मुलाच्या रिसेप्शनला सौ. वहिणींसह उपस्थित होता. सौ. वहिनी खूपच अतिथ्यशील आहेत आणि अगदी लहान वयात त्यांनी गजाननच्या सर्व पारिवारिक जबाबदाऱ्या हसतमुखाने पार पाडल्या आहेत. गजाननचा विवाह झाला तेंव्हा त्याच्यावर बऱ्याच कौटुंबिक जबाबदाऱ्या होत्या. तीन बहिणींचे विवाह व्हायचे होते. तो एकटा कमावणारा होता. परंतु शोभा वहिनींची त्याला इतकी सुरेख साथ मिळाली की त्याने ह्या सर्व जबाबदाऱ्या अगदी हसत खेळत पूर्ण केल्या. मातृभक्त असलेल्या गजाननला माता-पित्यांचे छत्र दीर्घकाळ लाभले. आईच्या शब्दाबाहेर गजानन कधीच जात नसे. त्याच्या आईचे प्रेम आम्हालाही लाभले.

गजानन काही वर्षे दोंडाईचा येथे होते. तिथे काडके नाना व बी. एन. अप्पा पाटील यांचा सहवास त्याला लाभला व त्यामुळे संघटनेचा पाया अधिक भक्कम झाला. गजाननच्या व आमच्या मैत्रीला जरी संघटनेचा पदर असला, तरी मूळ धागा पारिवारिक मैत्रीचा आहे. त्याला तर मैत्रीत संघटना मधे आलेली अजिबात आवडत नाही. त्याचा सतत मला आग्रह असतो की संघटना बाजूला ठेऊन आपण एकत्र २/३ दिवस कुठेतरी जाऊ या आणि जुन्या सर्व आठवणींना उजाळा देऊ या. मलाच आजपर्यंत ते जमले नाही. बऱ्याच वेळेला नागपूरला जाऊन त्याचे घरी जाणे होत नाही. अशा वेळी तो व वहिनी खूप नाराज होतात. एक मात्र खरे आहे तो जेंव्हा जेंव्हा नाशिकला येतो तेंव्हा अगदी सहपरिवार माझ्याकडे आल्याशिवाय राहत नाही.

त्याचा स्वभाव स्पष्ट बोलण्याचा आहे. आत एक बाहेर एक हे त्याच्या स्वभावात नाही बाबासाहेब हरदास हे त्याचे श्रद्धास्थान आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाची, नेतृत्वाची आणि खास करून वक्तृत्वाची सतत तारीफ करीत असतो. कृष्णा मोहाडीकर व त्याची पारिवारिक मैत्री आहे. सध्या तो नागपूर पतसंस्थेचा व्यवस्थापक आहे. लौकिक अर्थाने जरी तो नागपूरकर असला तरी मनाने मात्र नाशिककरच आहे. अशा ह्या नाशिकच्या नागपूरकरचे मनःपूर्वक अभिनंदन व अनंत शुभेच्छा.

# अमृत महोत्सवी कार्यकर्ते अर्थात नाबाद ७५

## १) ए व्ही आपटे, पुणे ५ जून



ए व्ही आपटे हे कामगार महासंघाच्या आजच्या पिढीला माहिती असण्याची शक्यता खूप कमी आहे त्यांना पाहिले अस सांगणारे भेटण्याची शक्यतश तर जवळपास नाहीच पण कामगार महासंघ आज ज्या मजबूत स्थितीत आहे ती स्थिती निर्माण करण्यामध्ये ह्यांच योगदान खूप मोठे आहे व अशा कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा यासाठीच हा प्रपंच आहे

श्री आपटे हे सब स्टेशन ऑपरेटर म्हणून वीज मंडळाच्या सेवेत कार्यरत होते पुणे झोन हेच त्यांचे कार्यक्षेत्र होते एक कर्तव्यदक्ष कामगार आणि अतिशय निष्ठावान कार्यकर्ता हाच त्यांचा खरा परिचय आहे ते ज्या सब स्टेशन मध्ये कार्यरत असत त्या सब स्टेशनची देखभाल तर अगदी स्वतःच्या घरासारखी करीत असत इतरांना सुद्धा तसेच मार्गदर्शन करीत असत त्यांचे तांत्रिक ज्ञान सुद्धा उत्तम असल्याने स्वत: बाळासाहेब सुद्धा अनेक मुद्द्यांवर यांचेशी चर्चा करीत असत किंवा मला अथवा मूळगुंद यांना सांगत असत मी व मूळगुंद यांनी अशाच एका कामासाठी अचानक आपटे कार्यरत असलेल्या लोणावळा सब स्टेशन मध्ये गेलो होतो व बारीक सारीक तांत्रिक बाबी त्यांचेकडून जाणून घेतल्या होत्या.युनिफॉर्म मधील ऑपरेटर मी त्यावेळी प्रथमच पहिला व सौ वहिनींनी अतिशय आपुलकीने केलेल्या पिठलं भाकरीचा आस्वाद घेतला होता.

श्री आपटे यांना अपत्य नाही त्यांनी आपल्या पुतण्यावरच अपत्यवत प्रेम केले सर्वसामान्य अनुभव असा आहे की काळाच्या ओघात याला काही किंमत राहत नाही परंतु आपटे यांचा पुतण्या मात्र याला अपवाद निघाला त्याला अमेरिकेत जॉब मिळाल्यावर सर्वप्रथम त्याने ६ महिन्यांसाठी काका काकूंना अमेरिकेत नेले सर्व प्रेक्षणीय स्थळे दाखवली याचे खूप मोठे अप्रूप आपटे दाम्पत्याला आहे

आपटे दाम्पत्य खूप धार्मिक आहे सेवा निवृत्तीनंतर ते मनःशांती केंद्राचे काम करतात परवाच यांचेशी फोनवर बोललो असता समजले की ते आजारी होते हॉस्पिटलमध्ये दोन तीन दिवस होते वहिनींनी खूप सेवा केली आता तब्येत सुधारत आहे परंतु खूप अशक्तपणा आलेला आहे तरीही दोघेही माझ्याशी बोलले व फोन करून चौकशी केल्याबद्दल समाधान व्यक्त केले. उभयतांना निरामय दीर्घ आयुष्य लाभो हीच प्रभू चरणी प्रार्थना.

## २) कमलाकर (बापू), चिटणीस पुणे ६ जून



बापू ह्या टोपण नावाने सर्वदूर परिचित असलेले कमलाकर चिटणीस यांनी दिनांक ६जून २०२० रोजी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे मनापासून अभिनंदन आणि निरोगी दीर्घ आयुष्यासाठी खूप खूप शुभेच्छा.

बापूंचा व माझा जुना परिचय आहे कामगार संघाच्या केंद्रीय कार्य समिती बैठकीच्या निमित्ताने त्यांची भेट होत असे त्यावेळी ते पुणे झोन मधील दक्षता विभागात युडिसी म्हणून कार्यरत होते त्यांचे व्यक्तिमत्व हे त्या विभागाला साजेसे असल्याने प्रथम त्यांच्याशी मुक्त संवाद होत नसे परंतु हळू हळू त्यांच्याशी परिचय वाढला व पुढे ह्या परिचयाचे मैत्रीत रूपांतर झाले व ती मैत्री आजपर्यंत कायम आहे

बापू हे एकेकाळी मा. श्री एस एन देशपांडे यांचे उजवे हात म्हणून ओळखले जायचे मा. श्री एस एन देशपांडे यांचा सतत प्रवास सुरु असे व अनेकदा त्यांचे सोबत बापू असत त्यामुळे पूर्ण महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांशी

बापूंचे मैत्रीचे संबंध आहेत अनेकदा महाराष्ट्राच्या बाहेर सुद्धा ते एस एन सोबत असत व तिथे कामगार कल्याण निधी ची माहिती देत असत त्या माध्यमातून त्यांचा अखिल भारतीय विद्युत मजदूर महासंघाच्या अनेक पदाधिकाऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले

पुणे झोनमध्ये सक्रिय कार्यकर्त्यांची संख्या खूप मोठी होती साप्ताहिक बैठक हे पुण्याचे वैशिष्ट्य होते व आजही आहे ह्या सर्व ठिकाणी बापू खूप सक्रिय होते स्वतःची रजा स्वतःचा खर्च करून संघटनेचे काम करणारी ती पिढी होती बापू ह्या पिढीचे सदस्य होते निरपेक्ष व निस्पृहपणे त्यानी संघटनेचे काम केले कोणत्याही पदाची साधी अपेक्षा सुद्धा त्यांनी कधी केली नाही

निवृत्तीनंतर अनेक दिवस ते कामगार कल्याण निधीचे कोषाध्यक्ष होते मानधन तर सोडाच पण स्वतःच्या स्कुटरने जा ये करण्यासाठी लागणारा पेट्रोल खर्च सुद्धा कधी घेतला नाही अशा निरपेक्ष कार्यकर्त्यांच्या त्याग तपस्येवर महासंघाची मजबूत इमारत उभी आहे याची आजच्या पिढीने नोंद घेणे आवश्यक आहे

सेवा निवृत्त वीज कामगार संघटनेचे सुद्धा ते अनेक दिवस पदाधिकारी होते पुणे येथे ह्या संघटनेची सुद्धा साप्ताहिक बैठक होते त्यात सुद्धा बापूंचे योगदान खूप मोठे आहे बापूंचा सुखी व समाधानी परिवार आहे सौ वहिनी व मुलांची चांगली साथ आहे मी त्यांच्या घरी मुक्काम केला असून सौ वहिनी यांच्या अतिथ्याचा लाभ घेतला आहे

सध्या प्रकृती हवी तशी साथ देत नसल्याने दैनंदिन कामात सहभागी होऊ शकत नाही परंतु नैमित्तिक कामात भागीदारी असते त्यांच्या योगदानाला मानाचा मुजरा व निरामय आयुष्यासाठी प्रार्थना

## ३) शशिकांत पुराणिक धुळे १२ मे



धुळे जिल्ह्यातील कामगार संघाचे काम अतिशय विपरीत परिस्थितीत टिकवून ठेवणारे व वाढवणारे श्री शशिकांत आप्पा पुराणिक यांनी दिनांक १२मे रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे मनापासून अभिनंदन व निरोगी दीर्घायुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा.

माझ्या सेवेचा प्रारंभ धुळे येथून झाला त्यावेळी धुळे सर्कल नव्हते फक्त दोन डिव्हिजन होत्या मी अर्बन सब डिव्हिजन ला रुजू झालो तिथे माझा व श्री पुराणिक यांचा परिचय झाला त्यांची व माझी शरीर यष्टी आगदी एक दुसऱ्यांना मॅचिंग होती इतक्या वर्षानंतर सुद्धा त्यात काहीच बदल झाला नाही त्याकाळात मी नवीनच होतो व प्रमुख्याने संघाचे कामकाजात जास्त व्यस्त होतो कामगार संघाचा फक्त सभासद झालेलो होतो श्री पुराणिक आप्पा मात्र कामगार संघाचे सक्रिय कार्यकर्ते होते त्यावेळी कामगार संघ व नोकर संघ अशी खूप स्पर्धा होती थोडी दुष्मनी पण होती सर्वत्र नोकर संघाचे वर्चस्व होते त्यांचे नेते कार्यकर्ते एकदम बलदंड होते त्यांचेपुढे बिलकुल सिंगल फसली पुराणिक आप्पा ठामपणे उभे होते याचा मी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे

पुराणिक अप्पा हे तसं अष्टपैलू व्यक्तिमत्व आहे विद्युत मंडळाच्या नाट्य स्पर्धा त्यांनी दिग्दर्शक ह्या स्वरूपात गाजवल्या आहेत

धुळे पत संस्था उभारणीत त्यांचे योगदान कोणी नाकारू शकत नाही तसेच धुळे पत संस्था धुळे कामगार संघ यांचे स्वमालकीचे कार्यालय अल्पावधीत उभे करण्यात त्यांची भूमिका महत्त्वाची होती

त्यांनी कार्यकर्त्यांचा चांगला संच उभा केला होता के बी दादा चिंचोळकर अप्पा, अशोक अण्णा पाटील, ह्या समवयस्क कार्यकर्त्यांबरोबरच काडके नाना, बी एन अप्पा ईश्वर लोहार ह्या तुलनेने ज्युनिअर कार्यकर्त्यांना सुद्धा योग्य ती संधी देऊन मोठे केले. आज बी एन अप्पा धुळे एकहाती सांभाळतात तर केंद्रातही महत्वाची भूमिका बजावतात. काडके नानांचे कार्य सर्व परिचित आहे. लोहार यानी तर अल्प वयात चांगलीच झेप घेतली होती परंतु त्यांचे अकाली निधन झाले.

आप्पा आता पुणे येथे स्थायिक झाले आहेत तिथे सुद्धा अनेक सामाजिक कार्याशी त्यांनी स्वतःला जोडून घेतले आहे सौ वहिनी सुद्धा मंडळातच होत्या संघटनेच्या कामात सक्रिय होत्या नाट्य कलाकार देखील होत्या आता कामगार संघाशी दैनंदिन संबंध नाही परंतू समाज कार्य मात्र अव्याहत सुरू आहे ह्या कामासाठी त्यांना भरपूर शुभेच्छा!!!

## ४) के बी दादा चौधरी धुळे १ सप्टेंबर



बलदंड शरीर यष्टी मातीतील कुस्ती खेळणारा पैलवान आणि पैलवान असून सुद्धा पैलवानी भेजा नाही असे माझे मित्र व जुन्या नाशिक झोनचे अनेक वर्षे अध्यक्षस्थान भूषविलेले श्री के बी दादा चौधरी यांनी १ सप्टेंबर रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा

दादा हे खऱ्या अर्थाने शक्ती केंद्र होते त्या काळात धुळे जिल्ह्यात नोकर संघाची प्रचंड दादागिरी होती त्यांचे संख्याबळ देखील प्रचंड होते त्यांच्यापुढे कामगार महासंघ नगण्य होता अशा अतिशय विपरीत परिस्थितीत संघटन टिकवायचे आणी ते वाढवायचे अशी खूप मोठी जबाबदारी प्रामुख्याने स्थानिक नेत्यांवर व सर्कल प्रमुख म्हणून नानासाहेब बिचवे यांचेवर होती श्री पुराणिक हे स्थानिक नेते होते त्यांची शरीर यष्टी जरी किरकोळ असली तरी लढण्याची जिद्द मोठी होती। त्यांना सुरक्षा कवच पुरवले ते दादांनी. त्यावेळच्या वातावरणाची आजच्या डिजिटल कार्यकर्त्यांना अजिबात कल्पना येणार नाही दररोज रस्त्यावर संघर्ष होत असे आणि दादा अशोक अण्णा व चिंचोलकर आप्पा यांची साथ नसती तर धुळे जिल्ह्याचे चित्र पालटणे शक्य झाले नसते पण ह्या निष्ठावान कार्यकर्त्यानी कशाचीही अपेक्षा न करता खूप मोलाची साथ दिली . मी नाशिक झोनचा झोनल सचिव असताना के बी दादा झोनचे उपाध्यक्ष

होते बऱ्याचदा झोन कार्य सामिती बैठकी चा समारोप त्यांना करावयास सांगत असे आणि ते इतका सुरेख समारोप करीत असत की फ़ारसे न शिकलेली व तांत्रिक कामगार असलेली व्यक्ती बोलत आहे असे वाटतच नसे त्यांच्या भाषणात हमखास एखादी ऐतिहासिक किंवा धार्मिक गोष्ट असे ज्या माध्यमातून ते अतिशय खुबीने संघटन कसे असावे याचा संदेश देत असत.

कामगार महासंघासाठी त्यांचे योगदान निदान जुन्या नाशिक झोनमधील कोणीही विसरू शकणार नाही सध्या त्यांची प्रकृती हवी तशी साथ देत नाही त्यामुळे दैनदिन कामामध्ये फारसा सहभाग नसतो पण नैमित्तिक कार्यात आवर्जून सहभाग असतो व अन्य वेळेस गोष्टी सांगेन युक्तीच्या चार ह्या भमिकेत असतात माझा आणि त्यांचा सतत संपर्क असतो व त्या माध्यमातून जुन्या आठवणींना उजाळा दिला जातो सौ वाहिनीचे त्यांच्या कार्यातील मोलाचे योगदान कोणालाही विसरता येणार नाही. त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभावे हीच प्रभाचरणी प्रार्थना .

## ५) श्री एम डी कुलकर्णी पुणे ११जुलै



एकेकाळी पुणे कामगार महासंघाच्या केंद्रस्थानी असलेले महासंघाचे निष्ठावान कार्यकर्ते श्री एम डी कुलकर्णी यानि दिनांक ११ जुलै २०२० रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले सर्वांच्या वतीने अभिनंदन व भरपूर शुभेच्छा

पुण्यामध्ये विविध क्षेत्रात प्राविण्य असलेल्या कार्यकर्त्यांची खूप चांगली टीम होती शिस्त भंग कारवाईत कामगार प्रतिनिधी म्हणून ज्यांची पूर्ण महाराष्ट्रात ख्याती होती त्यात श्री एम डी कुलकर्णी अग्रस्थानी होते अतिषय विपरीत परिस्थितीतून त्यांनी कामगारांना सही सलामत बाहेर काढल्याची अनेक उदाहरणे आहेत श्री एम डी कुलकर्णी यांनी आरोपमुक्त केलेले काही अभियंते पुढे जाऊन थेट डायरेक्टर पदापर्यंत जाऊन पोहोचले व विशेष म्हणजे आवर्जून एम डी कुलकर्णी यांचे नाव घ्यायला संकोच करीत नव्हते त्या काळात एम डी चे स्टेटस हे कपिल सिब्बल प्रशांत भूषण यांच्यासारखे होते

अन्य कार्यकर्त्यांप्रणाने एम डी आक्रमक नव्हते घोषणा देणे किंवा द्वार सभा गाजवणे हा त्यांचा पिंड नव्हता परंतु जवळपास सर्वच तांत्रिक आतांत्रिक अधिकाऱ्यांशी त्यांचे वैयक्तिक संबंध होते व जे काम आंदोलन किंवा उपोषण ह्या मार्गाने सुटणार नाही असे काम एस एन देशपांडे एम डी कडे सोपवत व आपल्या व्यक्तिगत संबंधांचा योग्य तो वापर करून एम डी तो विषय मार्गी लावीत असत.पुण्यात त्याकाळी कार्यकर्त्यांचा खूप सुरेख संच होता आणि एस एन देशपांडे हे ह्या सर्वांचे श्रद्धा स्थान होते

संघटनेचे वार्षिक रिटर्न तयार करणे असो की पगारवाढीचा प्रस्ताव असो की अन्य मागणी पत्र असो एम डी यांचे योगदान खूप मोठे होते

गेल्या अनेक दिवसांपासून ते अलिप्त आहेत नियमित असो की नैमित्तिक असो त्यांचा सहभाग नसतो पुणे वगळता नव्या पिढीला त्यांचे नाव सुदधा माहीत नाही पण एकेकाळी त्यांच्याशिवाय पान हलत नव्हते हे मुद्दाम नमूद करीत आहे. त्यांना खूप खूप शुभेच्छा.

## ६) व्ही व्ही उर्फ अप्पा कुलकर्णी पुणे




आपल्या नावापेक्षा आप्पा कुलकर्णी ह्या टोपण नावाने प्रसिद्ध असलेले श्री व्ही व्ही कुलकर्णी यांनी दिनांक रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात प्रवेश केला अभिनंदन व भावी निरोगी आयुषयासाठी भरपूर शुभेच्छा.

आप्पा कुलकर्णी पुणे ग्रामीण सर्कल मध्ये असताना संगमनेर डिव्हिजन ला बदलून आले होते एस एन देशपांडे हे तेंव्हा पुणे सर्कल मध्ये कार्यरत होते व कामगार संघाचे सरचिटणीस होते पुणे सर्कलवर त्यांची जबरदस्त पकड होती अहमदनगर तेंव्हा पुणे सर्कल मध्ये होते व कामगार संघ तितका मजबूत नव्हता अशात श्री आप्पा कुलकर्णी यांची संगमनेरला बदली झाली त्यांनी संगमनेर वीभागात सतत फिरून कामगार संघ रुजवला व वाढवला जुन्या फळीतील कार्यकर्ते अजून सुद्धा अप्पाचे नाव काढतात

नगर जिल्हा नाशिकला जोडल्यावर अप्पा पूण्याला परतले तेंव्हा ते कामगार संघाच्या बलेकिल्ल्यातच आल्याने व भरपूर कार्यकर्ते असल्याने आप्पानी आपला मोर्चा नाट्यसृष्टीकडे वळवला वीज मंडळाच्या नाट्य स्पर्धा कामगार कल्याण मंडळाच्या नाट्य स्पर्धा यामध्ये त्यांनीं एन्ट्री दिल्या अनेक व्यावसायिक नाटके पुण्याला आयोजित केली त्यांची त्या क्षेत्रात भरीव कामगिरी होती

आप्पा अविवाहित आहेत त्यामुळे सेवा निवृत्तीनंतर त्यांनी पुणे येथील भारतीय मजदूर संघाच्या कार्यालयाचे केअर टेकर म्हणून काम पाहिले त्यांचा मुक्काम सुद्धा कार्यालयातच असे परंतु उतार वयामुळे तब्येतीच्या तक्रारी वाढू लागल्या व त्यामुळे रात्री अपरात्री एकटे राहणे धोकादायक वाटू लागल्याने आपल्याच फलटण येथील कार्यकर्त्याने चालवलेल्या वृद्धाश्रमात त्यांची व्यवस्था करण्यात आली आहे श्री सावजी मुळगूद मुजावर आदी कार्यकर्त्यांचा नित्य सम्पर्क असतो त्यांना आपल्या सर्वांच्या वतीने खूप शुभेच्छा

## ७) श्री. आर बी निर्मळे, पुणे १ मार्च



पुणे येथील आणखी एक निष्ठावान कार्यकर्ते व माननीय श्री एस एन देशपांडे यांचे सहप्रवासी आर बी निर्मले यांनी दिनांक १ मार्च रोजी वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६ व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे अभिनंदन व भरपूर शुभेच्छा

रघुनाथ निर्मले हे पुण्यातील कामगार संघाचे अतिशय निष्ठावान कार्यकर्ते.ते सतत श्री एस एन देशपांडे यांचे सोबत असत

बरेच दिवस एकाच ऑफिस ला काम करीत असल्याने एस एन देशपांडे याना भेटायला आलेले बाहेरगावचे कार्यकर्ते प्रथम निर्मले याना भेटत व नंतर निर्मले स्वतः त्यांना घेऊन एस एन कडे जात असत त्यामुळे बाळासाहेब त्यांना नामदेवांची पायरी म्हणत असत जसे माऊलींचे दर्शन घेण्याआधी नामदेवांच्या पायरीचे दर्शन होते तसेच एस एन भेटायचे तर निर्मलेंना भेटावेच लागे हे उदाहरण फक्त दोघानमधील स्नेहभाव समजावा यासाठी बाळासाहेब देत असत.

उप मुख्य लेखा अधिकारी ह्या पदावर पोहचलेले ते पहिले कामगार महासंघाचे कार्यकर्ते ! अतिशय निस्पृह!मुख्य कार्यालयात दररोज कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणाऱ्या जनरेशन विभागात ते उप मुख्य लेखा अधिकारी ह्या पदांवर होते परंतु कोणाकडून साधा चहा सुद्धा कधी घेतला नाही आणि वरून कितीही दबाव आला तरी नियमबाह्य काम केले नाही हे मी व्यक्तिगत रित्या जाणतो

अखिल भारतीय विद्युत मजदूर संघाच्या राष्टीय कार्य करिणीत अनेक वर्षे होतें अखिल भारतीय कोषाध्यक्षाना मदत करणे हे त्यांचे मुख्य काम होते व ते त्यांनी पिंपळखरे, नंदा ओझे, रघु जी फडके यांना सर्व प्रकारचे साहाय्य करून केले

पेन्शन नाही सेवा निवृत्तीनंतर मिळालेले सर्व पैसे संपले वृद्धावस्थेतील आजार परिवाराच्या मागे लागले त्यामुळे उदर निर्वाहा साठी या वयात सुद्धा काहींना काही करावे लागत आहे त्यामुळे पूर्वी सारखा वेळ देऊ शकत नाहीत संपर्क खूप कमी झाला आहे माझा मात्र सम्पर्क असतो किमान हाल हवाल समजते मलाही बरे वाटते त्यांनाही बरे वाटत असावे. या माझ्या निष्ठावान मित्रास व निस्पृह कार्यकर्त्यास मानाचा मुजरा व खूप शुभेच्छा.

## ८) भास्कर झेमसे कल्याण १ जुलै



कामगार महासंघाचे जुने जाणते कार्यकर्ते व तारापूर सब स्टेशन मध्ये हॉट लाईन युनिट मध्ये कारागीर अ म्हणून निवृत्त झालेले श्री भास्कर झेमसे यांनी दिनांक १ जुलै रोजीआपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि निरामय आयुष्यासाठी भरपूर शुभेच्छा

माझ्या प्रदीर्घ संघाटनात्मक प्रवासात कार्यकर्ता ह्या नात्याने सर्वात जास्त प्रभावित जर कोणी केले असेल तर ते श्री झेमसे यांनी.एकतर ते तत्कालीन कामगार संघात एकमेव तांत्रिक कामगार असलेले केंद्रीय पदाधिकारी होते तेही हॉट लाईन युनिट मध्ये आणि महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात असलेल्या तारापूरला सर्व साधारणपणे केंदीय कार्य समितीच्या बैठकी ह्या पुणे नासिक जळगाव औरंगाबाद अशा ठिकाणी होत असत व शनिवार रविवारी असत श्री झेमसे हे तांत्रिक कामगार असल्याने शनिवार रविवार सुटी नसे त्यातूनही ते तारापूर ला म्हणजे एका वाहनाने प्रवास नाही त्यामुळे वेळ जास्त लागे व खर्च ही जास्त होत असे त्या काळात संघटनेसाठीचा प्रवास हा स्वखर्चाणेच करावा लागे भास्कररावांच्या जागी दुसरा कोणीही असता तरी त्याने सर्व बैठकीना उपस्थित रहाणे टाळले असते परंतु माझ्या आठवणीनुसार त्यांनी एकही बैठक चुकवली नाही आणि याचे मला नेहेमीच कौतुक वाटत असे

श्री झेमसे हे स्वगिय बाळासाहेब साठे व मा अण्णा देसाई आणि नंदा ओझे ह्यांच्या सतत संपर्कात असत आणि त्यामुळे त्यांच्या क्षेत्रातील कामगारांच्या समस्या सुटण्यास मदत होत असे तसेच मुख्य कार्यालय पातळीवरील घडामोडी त्यांना लवकर समजत याचा ते सदस्य संख्या वाढवण्यासाठी लाभ उठवीत असत खास करून पगारवाढीच्या चर्चेचे अपडेट ते सर्वात आधी सांगत असत व शक्य तेंव्हा बाळासाहेब किंवा अण्णा देसाई अथवा नंदा ओझे यांची द्वार सभा आयोजित करीत असत आम्ही सुद्धा श्री झेमसे यांच्या द्वार सभा आयोजित करून तांत्रिक कामगारांना आकर्षित करीत असू

कामगार संघात त्यांनी विविध पदे भूषवली उपाध्यक्ष संघटन मंत्री कार्याध्यक्ष अशा महत्त्वाच्या पदांची जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे सांभाळली ते वीज कामगार कल्याण निधीचे विश्वस्त होते परंतु निवृत्तीनंतर त्यांनी सर्व पदे सोडली व संघाच्या अन्य सामाजिक कार्यात स्वतःला गुंतवून घेतले पनवेल येथील डॉक्टर हेडगेवार रुग्णालयात अनेक वर्षे ते विना मोबदला रुग्ण सेवा करीत असत

आता मात्र प्रकृती साथ देत नाही पनवेल जवळील पळस्पे येथे ते राहतात मध्यंतरी आम्ही त्यांच्या घरी जाऊन बराच वेळ जुन्या आठवणी जागवल्या माझा त्यांच्याशी संपर्क असतो असे ध्येयवेडे कार्यकर्ते कमी असतात यापुढे तर असे कार्यकर्ते लाभणे खूप कठीण आहे. पुनः एकदा त्यांना खूप खूप शुभेछा.

## ९) श्री एस टी म्हेत्रे सोलापूर १७ सप्टेंबर



१७ सप्टेंबर विश्वकर्मा जयंती भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन आणि हो तोच आमचे मित्र कामगार संघाचे माजी सरचिटणीस व वीज मंडळाच्या सेवेतून उरण येथील वायू विद्युत निर्मिती केंद्रातून निवृत्त झालेले श्री एस टी म्हेत्रे यांचा सुद्धा प्रकट दिन! दिनांक १७ सप्टेंबर २०२० रोजी श्री म्हेत्रे यांनी आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण करून ७६व्या वर्षात पदार्पण केले त्यांचे विशेष अभिनंदन यासाठी की शरीरातील जवळपास सर्व अवयवांच्या आजारावर यशस्वी रित्या मात करून त्यांनी ७६ व्या वर्षात पदार्पण केले आहे आणि भावी आरोग्यदायी आयुष्यसाठी भरपूर शुभेच्छा

श्री म्हेत्रे यांचे व्यक्तिमत्व सगळ्यांपेक्षा जरा हटके आहे कामगार नेत्याकडे वक्तृत्व नेतृत्व अभ्यासू वृत्ती चर्चेचे कसब निर्भीडपणा हे गुण सर्वसाधारण पणे असताताच श्री म्हेत्रे यांचेकडे हे गुण आहेतच असाही समज आहे की कामगार नेत्याला विनोदाचे वावडे असते पण म्हेत्रे याला अपवाद आहेत ते स्वतः सदा हसतमुख असतात आणि त्यांच्या सहवासातील अन्य व्यक्ती सुद्धा आपले हसू आवरू शकत नाही इतकी त्यांची विनोद बुद्धी तल्लख आहे विनोद बुद्धी बरोबरच ते रसिक आहेत खाण्या पिण्यात हयगय नाही सर्व गोष्टींचा अतिशय मनापासून आस्वाद घेणार स्वतः खाणार इतरांना खाऊ घालणार थोडक्यात सांगायचे तर संघटनेतील पद त्यांना कधी बोजा वाटला

नाही हे पद सुद्धा त्यांनी अगदी हसतखेळत सांभाळले त्यांच्या सहवासातील कार्यकर्त्याला सुद्धा आपण सरचिटणीसाबरोबर असे कधी जाणवले नाही ते सदैव एकदम नॉर्मल असत.

विपूल वाचन आणी विविध विषयांचा खोलात जाऊन अभ्यास हा त्यांचा छंद आहे त्यांचे वक्तृत्व अभ्यासपूर्ण असे तरीही ते कंटाळवाणे नसे कारण अभ्यासाला विनोदाची किनार असे. या अभ्यासवर्ग असो की द्वार सभा असो त्यांचे भाषण कधीही रटाळवाणे होत नसे. शिस्त भंग कारवाईच्या चौकशीत कामगारांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी केलेली कामगिरी ही अतिशय लाजवाब आहे कामगारांना तर त्यांनी सोडवलेच पण आरोपपत्र मिळालेल्या अभियंत्यांची सुद्धा पहिली पसंती श्री म्हेत्रे यांनाच असे आरोप पत्रातील त्रुटी शोधून काढणे व त्या लक्षात आणून देऊन आरोपपत्रच कसे चुकीचे आहे असे सिद्ध करून ते मागे घेण्यासाठी ते दबाव वाढवीत असत व अनेकदा चौकशी विना आरोपीत कामगाराला ते दोषमुक्त करीत असत जर ते शक्य झालेच नाही तर चौकशीत आपले सर्व कौशल्य वापरून संबंधित कामागरास मुक्त करीत असत

म्हेत्रेचे शरीर अनेक आजारांचे माहेर घर आहे वेगवेगळे आजार तिथे सुखाने नांदतात मोतिबिंदू पासून हर्निया पर्यंत अनेक शस्त्रक्रिया झालेल्या आहेत कोणत्याही आजाराने ते गांगरून गेले नाही त्यांच्या प्रत्येक आजाराशी त्यांनी दोस्तीच केलेली आहे आपल्या आजाराचे किंवा ऑपरेशनचे ते इतके रसभरीत वर्णन करतात की ऐकणार्याला आपण पू ल किंवा वपुंचे कथाकथनच ऐकतो आहे असे वाटावे त्यामुळे ज्याला डॉक्टरांनी ऑपरेशन सांगितले असेल त्याने अगोदर श्री म्हेत्रे यांचेशी गप्पा माराव्या त्याची ऑपरेशनची भीती नाहीशी झाल्याशिवाय राहणार नाही

म्हेत्रे म्हंटले की पूर्वीचे सोलापूर सर्कल डोळ्यापुढे येते पूर्ण महाराष्ट्रात सोलापूर सर्कल कामगार संघाचे नंबर १ सर्कल होते व याचे सर्व श्रेय श्री म्हेत्रे यांना आहे वर्गणी, देणगी, सभासद संख्या कार्यकर्त्यांचा संच कार्यक्रम ह्या सर्व बाबतीत हे सर्कल आदर्श होते त्यामुळेच श्री म्हेत्रे याना कामगार संघाच्या सरचिटणीस पदाची जबाबदारी बाळासाहेबांनी दिली व आपली निवड चुकीची नाही हे त्यांनी सिद्ध केले. त्यांच्या नंतर ही जबाबदारी माझ्याकडे आली एकप्रकारे मी त्यांचा वारस आहे व याचा ते नेहेमी कौतुकाने उल्लेख करतात. सौ वहिनी मंडळातच होत्या त्या आणि मी एकाच दिवशी निवृत्त झालो मुले मुली सुखी आणि संपन्न आहेत अशा अष्टपैलू व्यक्तीमत्वास खूप खूप शुभेच्छा.

## नाबाद ८०

### १०) श्री बाळासाहेब पुराणिक २५ जुलै




कामगार महासंघाचे व भारतीय मजदूर संघाचे वरिष्ठ नेते व मार्गदर्शक मा श्री बाळासाहेब पुराणिक यांनी २५जुलै २०२० रोजीआपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण करून ८१ व्या वर्षात पदार्पण केले.कुशल संघटक, निरपेक्ष कार्यकर्ता, पद पैसा प्रसिद्धी याचा जराही मोह नाही असे बाळासाहेब पुराणिक हे तळागाळातील कामगारांचे नेते आहेत ह्या वयात देखील त्यांचा उत्साह जराही कमी झालेला नाही मूलतः संघ स्वयंसेवक असलेले बाळासाहेब संघाचे संस्कार काधिही विसरलेले नाहीत

स्वर्गीय बाळासाहेब साठे, अण्णाजी अकोटकर, रमण भाई शहा, मनहर भाई मेहता, एस एन देशपांडे, के के हरदास, अण्णाजी देसाई ह्या सर्व मान्यवर नेत्यांबरोबर बाळासाहेबांनी काम केले असल्याने अनुभवाची खूप मोठी शिदोरी त्यांचे कडे आहे.

प्रारंभी जरी ते कल्याण झोन मध्ये असले तरी त्यांच्या सेवेचा बराच काळ हा मुख्य कार्यालयात आणि तोही भविष्य निर्वाह निधी विभागात गेला त्यावेळी सगळं मॅन्युअल होते. त्यामुळे कर्ज मंजुरी विलंबाने होत असे कर्ज मंजूर करून आणणारे एजंट जागोजागी निर्माण झाले होते पैशांचा खेळ चाले अशावेळी बाळासाहेबांची भविष्य निर्वाह विभागातील उपस्थिती ही कामगार संघासाठी वरदान ठरली बाळासाहेबांना चिठ्ठी दिली की तुरंत काम होत असे चिठ्ठी घेऊन गेलेल्या कार्यकर्त्याला बाळासाहेब स्वतःच चहा पाजत असत त्यांच्या ह्या स्वभावामुळे सर्वत्र त्यांची एक स्वच्छ कार्यकर्ता अशी प्रतिमा निर्माण झाली व त्यांच्या ह्या प्रतिमेचा महासंघ विस्तारासाठी खूप उपयोग झाला

ते जोपर्यत भविष्य निर्वाह विभागात होते तोपर्यन्त तेच सर्वांचे नेते होते त्यांच्या नेतृत्वाखालीच पगार वाढीचे वेळी मोर्चा येत असे त्यांना ना कधी अहंकाराचा वारा लागला ना त्यांच्यावर कधी आरोप झाले संघटनेसाठी जीवन देणारे पण स्वतः साठी कशाचीही अपेक्षा न करणारे फार कमी असतात त्यापैकी एक बाळासाहेब आहेत पूर्वीही कधी श्रीमंती नव्हती आताही नाही पण मनाच्या श्रीमंतीने त्यांनी सर्वाना आपलेसे केले व जातील तिथे आपल्या कार्याचा ठसा उमटवला. असे माझे मित्र मार्गदर्शक गुरू व निस्पृहतेचे प्रतीक असलेल्या बाळासाहेब पुराणिक यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभावे यासाठी अनंत शुभेच्छा

### ११) श्री बी डी (भाऊ मदाने) नासिक २४ मे



कामगार महासंघाच्या स्थापने पासून सदस्य असलेले श्री बी डी मदाने यांनी आपल्या वयाची ८० वर्षे पूर्ण करून ८१व्या वर्षात प्रवेश केला त्यांचें मनापासून अभिनंदन. भाऊ मदाने हे माझे मित्र सहकारी तर आहेतच परंतु नाते संबंध सुद्धा आहेत. त्यामुळे मी अनेक वर्षांपासून ओळखतो बिनधास्तपणा, नो फिकीर, उद्याची चिंता आज करून आजचा दिवस खराब करायचा नाही हे त्यांचे स्वभाव वैशिष्ठय आहे. निवृत्तीनंतर २२ वर्षांनी आज जे अक्षरश निष्कांचन असूनहीं भाऊ मदाने सदा हसतमुख असतात कधीही कोणापुढे हात पसरणे नाही की रडगाणे नाही. आशा आनंदी व्यक्तीमत्वास खूप खूप शुभेच्छा!

# थोडक्यात महत्वाचे

## (१) भांडुप परिमंडळ स्वागतम सुस्वागतम







मा श्री गणेशकर साहेब मुख्य अभियंता हे भांडुप झोन ला रुजू झाले महाराष्ट्र वीज कामगार महासंघ तर्फे त्यांचे स्वागत करण्यात आले. आपल्या संघटने तर्फे त्यांचे स्वागत करणेसाठी आपले कामगार महासंघ कार्याध्यक्ष मा. श्री पिवळ साहेब, उपाध्यक्ष मा. श्री कासारे साहेब, निवासी सचिव श्री प्रशांत बांबुर्डेकर साहेब व झोन पदाधिकारी भांडुप झोन ठाणे सर्कल व वाशी सर्कल पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजार होते.

सदर कार्यक्रमानंतर भांडूप झोनच्या आवारात मा श्री पिवळ साहेब कार्याध्यक्षांनी ठाणे सर्कलमधील विद्युत सहाय्यक ज्यांचे तंत्रज्ञ म्हणून समावेश झाले त्यांचे विशेष अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## (२) प्रादेशिक संचालक श्री नाळे यांचा संदेश

प्रिय जनमित्र व उपकेंद्र चालक यांना अनंत चतुर्दशीच्या हार्दिक शुभेच्छा!!!

आज आपण आपल्या लाडक्या गणरायाचे विसर्जन करतो व गणपती बाप्पा पुढच्या वर्षी लवकर या अशी प्रार्थना करतो. या गणराया सोबतच आपण पण आज कामाच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व असुरक्षित सवयींचेसुद्धा विसर्जन करू व निश्चय करू की त्यापुढील काळात संपूर्ण पुणे परिक्षेत्र हे शून्य अपघात परिक्षेत्र होईल. चला आज आपण गणरायाच्या साक्षीत सुरक्षा प्रतिज्ञा घेऊ या!

मी प्रतिज्ञा करतो की, माझ्या कौटुंबिक जबाबदारीचे व्यवस्थित निर्वाह करण्यासाठी मी सुरक्षिततेशी कधीही तडजोड करणार नाही योग्य त्या साधनांचा वापर करून व सुरक्षेविषयी सर्व नियम पाळून नेहमी सुरक्षित काम करीन व माझ्या सर्व सहकाऱ्यांकडून सुरक्षित काम करून घेईन.

तसेच ग्राहकांच्या तक्रारींची त्वरित दखल घेऊन त्यांच्या सुरक्षिततेची सुद्धा काळजी घेईन व महावितरण कंपनीची प्रतिमा उत्तरोत्तर उजळण्याचा प्रयत्न करीन. धन्यवाद!!

## (३) सौ रिता ठाकरे यांना प्रेमपूर्वक निरोप




महाराष्ट्र वीज कामगार महासंघाच्या प्रदेश सचिव तथा उपव्यवस्थापक (वी व ले) अमरावती शहर विभाग सौ रिताताई ठाकरे यांची नागपूर येथे विनंती बदली झाल्यामुळे अमरावती सर्कल कार्यकारिणी तर्फे सौ ठाकरे मॅडमचा निरोप समारंभ छोटेखानी स्वरूपात झोन सचिव श्री हेमंत मस्करे यांचे घरी आयोजित करण्यात आला, याप्रसंगी सौ मीनाताई वाटणे, सौ किर्तीताई देशमुख तसेच श्रीमती वीणाताई इंगळे यांचे हस्ते शाल, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सौ ठाकरे मॅडमना सन्मानित करण्यात आले, कार्यक्रमाला झोन उपाध्यक्ष श्री आशिष जोशी, सचिव हेमंत मस्करे, सर्कल अध्यक्ष श्री अब्दुल कलाम अब्दुल मजीद, सचिव गजानन गव्हाळे, संघटक सुनील फुसे, कोषाध्यक्ष श्री गणेश गाले, विभाग सचिव श्री अभिजित सदाव्रती सह सौ ठाकरे मॅडमचा यजमान श्री ठाकरे साहेब उपस्थित होते.

## (५) नाशिक वितरण झोन बदली प्रश्नावर आंदोलनाच्या मार्गावर

विनंती बदल्यांचा गुंता नाशिक वितरण झोनमध्ये वाढत चालला आहे एकतर एकूण १५% बदल्या करण्याचा निर्णय झाला व त्यात मुख्य कार्यालयाने केलेल्या बदल्यांचा सुद्धा समावेश असल्याने फील्ड मधील बदल्यांचा स्कोप कमी झाला त्यातही नाशिक झोनने नवीन घोळ केला ती म्हणजे एच ओ ने व प्रादेशिक कार्यालयाने इंटर झोन बदली

केलेल्या कामगारांचे त्यांना हवे त्याठिकाणी पोस्टिंग केले त्यामुळे नाशिक झोन अंतर्गत ज्यानी विनंती बदल्या मागितल्या त्यांच्यासाठी जागाच शिल्लक राहिल्या नाहीत एकतर मुख्य कार्यालय व प्रादेशिक कार्यालयाने केलेल्या बदलामुळे कमी कामगारांच्या विनंती बदल्यांचा विचार होणे व त्यातही झोनने केलेला गोंधळामुळे वातावरण तापले व चर्चेतून मार्ग निघत नसल्यामुळे झोन सचिव श्री काटे यांनी आंदोलनाची नोटीस दिली त्याची तातडीने दखल घेऊन मुख्य अभियंता सौ पगारे यांनी चर्चा केली व आपला मुद्दा बरोबर असल्याचे मान्य केले परन्तु ही पश्चात बुद्धी झाली कारण आधीच बाहेरून आलेल्याना डिटेल पोस्टिंग दिलेली असल्याने अडचण निर्माण झालेली आहे.

महामंत्री शंकरराव पहाडे यांनी सुदधा मुख्य अभियंता यांचेशी चर्चा केली आहे जर आपली मागणी मान्य झाली नाही तर आंदोलन करण्याचा निर्धार झोन सचिव श्री काटे यांनी व्यक्त करून तसे व्यवस्थापनाला कळवले आहे बघू या काय होते ते.

### (४) वीज कामगार कल्याण निधी मदत

कै. विनोद पाटील यांच्या पत्नीला कामगार कल्याण निधि चा १२०००चा धनादेश देतांना कामगार महासंघ जळगाव उपअध्यक्ष व कल्याण निधी चे ट्रस्टी श्री यशराज हंबर्डीकर, सहसचिव श्री सुनिल पाचपांडे, भुसावल विभागीय सचिव निलेश बारी , प्रविण धनगर व मी भुषण पाटील विभागीय अध्यक्ष भुसावल.




### (६) स्वागतम सुस्वागतम




महाराष्ट्र वीज कामगार महासंघ, नागपूर पारेषण झोन या ठीकानी नव्याने रुजू झालेले मुख्य अभियंता मा. श्री.वालके साहेब यांना शुभेच्छा! देतांना महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे पदाधिकारी.

## कोरोना महामारी संकट काळात रोजगार वाचवण्याची भारतीय मजदूर संघाची मागणी

दि. ११ सप्टेंबर २०२० रोजी उपजीविका बचाव करण्यासाठी भारतीय मजदूर संघाने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयालासमोर प्रातिनिधिक स्वरूपात निवेदन दिले.

कोरोना महामारीमध्ये २ कोटी कामगारांचा रोजगार गेल्यामुळे कामगारांसमोर उपजिवीकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. रोजगार निर्मितीकरिता विशेष अभियान, मायग्रंट वर्कर्सची नोंदणी, बिडी कामगारांना किमान वेतन, स्वत:चे घर, सर्व कामगारांना मोफत आरोग्य व शिक्षण सुविधा, वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांना रोजगारात स्थैर्य, रोजगाराचे रक्षण, स्थाई रोजगार, बेरोजगार भत्ता, कोरोना काळातील संपूर्ण वेतन व नोकरीची हमी, ईएसआय योजनेमार्फत cashless medicalm चा लाभ ई. बाबतीतचे निवेदन मा. जिल्हाधिकारी श्री. राजेश देशमुख यांना भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने निवेदन दिले. यावेळी मायग्रंट वर्कर्सची नोंदणी नोडल एजन्सीमार्फत लवकरच चालू करण्यात येईल व उपजिविके रक्षणासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन मा. जिल्हाधिकारी यांनी




दिलेले आहे. यावेळी भारतीय मजदूरच्या वतीने अखिल भारतीय बिडी मजदूर महासंघाचे सरचिटणीस उमेश विस्वाद, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाचे जनरल सेक्रेटरी सचिन मेंगाळे, भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्हा पदाधिकारी अर्जुन चव्हाण, अभय वर्तक, अजेंद्र जोशी उपस्थित होते.

# अभिनंदन

## (१) कुमारी गार्गी पाटील ९२%



विश्वकर्मा पतसंस्था वसई चे अध्यक्ष तसेच उपव्यवस्थापक (वि व ले) पालघर सर्कल कल्पेश पाटील यांच्या कन्या गार्गी पाटील यांचे दहावीत ९२% मार्क मिळवल्याबद्दल अभिनंदन.

## (२) कोरोना योद्धा पुरस्काराने कल्पेश पाटील सन्मानित




कोविड १९ च्या कालावधी मध्ये उत्कृष्ट कामगीरी निमित्त पालघर मंडळ अंतर्गत असलेले उपव्यवस्थापक श्री.कल्पेश जयवंत पाटील यांना कोरोणा योध्दा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## (३) साईनाथ कवठेकर ९३/२०%



वीज कामगार महासंघ (परळी वै. निर्मिती) चे झोनल सचिव राम कवठेकर यांचे चिरंजीव साईनाथ कवठेकर यांना दहावीच्या परीक्षेत ९३.२० टक्के घेऊन उत्तीर्ण

## (४) श्री नेवे यांचे प्रशंसनीय कार्य!!

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे कल्याण झोन संघटन सचिव तसेच भारतीय मजदूर संघाचे पालघर जिल्हा प्रमुख श्री चंद्रकांत नेवे यांनी त्यांच्या दिवंगत पत्नीच्या स्मरणार्थ सरतोडी येथील शाळेला भेट दिले. त्यांना आवश्यक असलेले कपाट भेट दिले. यापूर्वीसुद्धा श्री नेवे यांनी सारतोडी शाळेला त्यांच्या गरजेनुसार कपाटाची भेट दिली आहे श्री नेवे यांचे हे कार्य निश्चितच कौतुकास्पद आहे.




## (५) श्री चंद्रभान बाभळे कोरोना योद्धा पुरस्काराने सन्मानित

महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे यवतमाळ जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, महावितरण ढाणकी उपविभाग येथे कार्यरत प्रधान तंत्रज्ञ श्री चंद्रभान बाभळे यांचा भारतीय जनता पार्टी ढाणकी शहर तर्फे कोरोना योद्धा म्हणुन सन्मान झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन*

प्रभाकर दिघेवार, सर्कल अध्यक्ष, महाराष्ट्र वीज कामगार महासंघ यवतमाळ

## (६) अनिमेश ओझे यांचा स्तुत्य व अनुकरणीय उपक्रम



(सर्वप्रथम सगळ्यांना मन:पूर्वक धन्यवाद आणि मोठ्यांना नमस्कार)

ज्यांची बाग फुलून आली, त्यांनी दोन फुले द्यावीत

आपण सर्वजण कायम ऐकत असतो की आपण ह्या समाजाच काही ना काहीतरी देणं लागतो, त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती वैयक्तिकरित्या, सामाजिकरित्या प्रयत्न करत असते.

कोविड, लॉकडाऊन, अनलॉक हे सगळं चालु असताना सामाजिक दायित्वाचे भान जपत आपण आपली सामाजिक जबाबदारी उचलावी, हि कुटुंबियांची शिकवण प्रत्यक्षात आणण्यासाठी मी हा प्रयत्न करत आहे.

पनवेलमधील दगडी शाळा आपणा सर्वांना ज्ञात असेल, किंबहुना ह्याच शाळेत माझे आजोबा, बाबा तसेच अनेक परिचितांचे प्राथमिक शिक्षण झाले. याबाबतची कृतज्ञता म्हणून याच दगडी शाळेतील २ विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष इयत्ता ७वी ते १०वी साठी आवश्यक असणारी संपूर्ण शैक्षणिक मदत-साहित्य (गणवेश, वह्या, पुस्तक, व्यवसाय, कंपास, दप्तर इ.) अगदी हि सगळी वर्ष उत्तीर्ण होईपर्यंत पुरवण्याचा माझा मानस आहे.

आज माझ्या वाढदिवसाच्या दिवशी सदर शाळेचे मुख्याध्यापक, विद्यार्थी-पालकांसोबत घरी चर्चा करुन सदर उपक्रमाची सुरुवात केली. ही संधी मला दिल्याबद्दल दगडी शाळेतील मुख्याध्यापक-शिक्षकांचे मन:पूर्वक आभार.

(चि. अनिमेश ओझे हा कामगार महासंघाचे मार्गदर्शक श्री नंदा ओझे यांचा नातू व अमित ओझे यांचा सुपुत्र आहे इतक्या लहान वयात इतकी मोठी समज खरोखरच कौतुकास्पद आहे विलास झोडगेकर)

# सेवा-निवृत्ती

## सेवा निवृत्ती श्री विजय हिंगमीरे पुणे

**– विलास झोडगेकर**



महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे महा वितरण चे उप महामंत्री श्री विजय हिंगमीरे हे दिनांक३० सप्टेंबर २०२० रोजी पुणे झोन मधून सेवा निवृत्त झाले निवृत्ती नंतरच्या निरोगी दीर्घायुष्यासाठी त्यांना अनेक शुभेच्छा १९९९ साली रोहा येथे संपन्न झालेल्या महासंघाच्या अधिवेशनात मी पाहिलयंदाच श्री हिंगमीरे यांना पाहिले माझ्या माहितीनुसार ते अन्य संघटनेतून श्री सुभाष सावजी यांच्या कार्य पद्धतीमुळे प्रभावित होऊन कामगार महासंघाचे सदस्य झाले. त्यामुळे त्यांचे हे पहिलेच अधिवेशन असावे ह्याच अधिवेशनात माझी महासंघाच्या महामंत्रीपदी निवड झाली श्री सावजी सुद्धा ह्याच अधिवेशनात उप महामंत्री झाले सावजी यांच्या नावाची घोषणा झाल्यावर श्री हिंगमीरे यांनी खूप जल्लोषात सावजी यांचे स्वागत केले उभे राहून स्वतः घोषणा दिल्या व पूणेकरांना त्यात सहभागी करून घेतले हे मला आजही चांगले आठवते सावजी यांनीच त्यांची ओळख करून दिली.

महामंत्री होण्याआधी सुद्धा माझे पुण्याला अनेकदा जाणे होत असे महामंत्री झाल्यावर त्यात आणखी भर पडली. पुणे येथील बहुतेक दौऱ्याचे वेळी श्री हिंगमीरे यांची भेट होऊ लागली. काहीवेळा कामानिमित्त तर बऱ्याचदा निववळ सदिच्छा भेट!! त्यामुळे जवळीक वाढली त्यांची काम करण्याची इच्छा व क्षमता लक्षात आली. त्यांच्या अंगात नेतृत्व गुण असल्याने संघटनात्मक जबाबदाऱ्या देण्यात येऊ लागल्या त्या सर्व जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वी रित्या पार पाडल्या.

श्री अशोक जाचक यांना केंद्रीय पदाधिकारी करण्याचा निर्णय झाल्यावर पुण्याचे झोनल सचिव कोणाला करायचे याची जेंव्हा चर्चा झाली तेंव्हा श्री हिंगमीरे यांचे नावावर शिक्कामोर्तब व्हायला अजिबात वेळ लागला नाही. श्री मुळगुंद, सावजी, कुलकर्णी, जाचक अशा दिग्गज पदाधिकाऱ्यांनी ह्या पदाची प्रतिमा खूप उंचावली होती तसेही पुण्याचे झोनल सेक्रेटरी हे पद प्रतिष्ठेचे असते. परंतु प्रतिष्ठे बरोबर जबाबदारी देखील येते त्यामुळे श्री हिंगमीरे यांना एकाचवेळी प्रतिष्ठा मिळाली व मोठी जबाबदारी देखील खांद्यावर आली आणि हिंगमीरे यांनी आपल्या पूर्वसूरींनी कमावलेल्या प्रतिष्ठेला निव्वळ कायम ठेवली असे नाही तर ती वाढवली व जबाबदरीत सुद्धा कुठेही कमी पडले नाही त्यांच्या कामाची पावती म्हणूनच सुरेश सोनार यांचे नंतर महावितरण चे उप महामंत्री हे दुसरे महत्वाचे पद सोपवण्यात आले व गेल्या तीन वर्षांपासून हे पद सांभाळतांना जराही कसूर केली नाही. त्यांचा कार्याध्यक्ष श्री पिवळ, महामंत्री श्री पहाडे व अध्यक्ष श्री होळीकर आणि संघटन मंत्री श्री सावजी यांचेशी अतिशय चांगला संवाद आहे व्हाट्सअप्प च्या माध्यमातून ते सतत झोनल पदाधिकारी यांचेशी सम्पर्क ठेवतात बदल्या असो की मेडिक्लेम वा अन्य मुख्य कार्यालय पातळीवरील प्रश्न यात तातडीने लक्ष घालून अध्यक्ष/महामंत्री यांच्या मदतीने मार्गी लावतात

श्री हिंगमीरे पुणे पत संस्थेचे चेअरमन सुध्दा होते हे आणखी एक प्रतिष्ठित पद त्यांनी भूषविले आहे व मूळगुंद सावजी यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चांगला न्याय ह्या पदाला दिला आहे. ते एक चांगले वक्ते आहेत द्वार सभेत त्यांनी दिलेल्या घोषणा हाच चर्चेचा विषय असतो

वीज मंडळात ते ब्ल्यू प्रिंटर म्हणून कामाला लागले व त्याच पदावर निवृत्त झाले. त्यांच्या प्रत्यक्ष कामात अनेक बदल झाले पण पद मात्र बदलले नाही ही त्यांची खंत सुद्धा होती पण त्यांनी परिस्थिती स्वीकारली.

अजूनही माझे पुण्याला अधून मधून जाणे होते आता माझेकडे महाराष्ट्राची कोणतीच जबाबदारी नसल्याने कोणाला विनाकारण बोलावू नये असे मीच सांगितलेले असल्याने सावजी कोणाला सांगत नाहीत परंतु तरीही सुगावा लागला तर हिंगमीरे हमखास येतात कोणी कळवले नाही म्हणून नाराजी व्यक्त करतात पण मीच त्यांना सांगतो की आता माझा प्रोटोकॉल पाळण्याची आवश्यकता नाही.

माझ्या माहितीनुसार हिंगमीरे यांनी सर्व पारिवारिक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत प्रकृती उत्तम आहे त्यामुळे मंडळातील निवृत्ती संघटनेतील निवृत्ती ठरू नये. संघटनेने सुद्धा त्यांना कार्यरत ठेवावे म्हणजे दोघांनाही त्याचा लाभ होईल.

पुन्हा एकदा त्यांना हार्दिक शुभेच्छा

## श्री. साहील सैयद यांना निरोप

भैरोबा सब स्टेशन येथे कार्यरत असलेले श्री. साहिल सय्यद यांच्या



निरोप समारंभ निमित्त महाराष्ट्र वीज कामगार महासंघातर्फे पुष्पगुच्छ व व पुढील वाटचालीस शुभेच्छा देताना बंडगार्डन विभागीय अध्यक्ष श्री. विजय जोशी

## सौ भारती ठाकूर नासिक

**– विलास झोडगेकर**

नासिक शहर विभागात सहायक लेखापाल म्हणून कार्यरत असलेल्या कामगार महासंघाच्या सक्रिय कार्यकर्त्या सौ भारती ठाकूर ह्या दिनांक ३१ ऑगस्ट २०२० रोजी महावितरण कंपनीच्या सेवेतून निवृत्त झाल्या. निवृत्ती नंतरच्या आरोग्यसंपन्न दीर्घायुष्यासाठी आपल्या सर्वांच्या वतीने भरपूर शुभेच्छा.



सौ भारती ठाकूर यांचे पिताजी हे नोकर संघाचे सक्रिय व निष्ठावान कार्यकर्ते होते. तसेच नंतर ड्राइंग स्टाफ असोसिएशनचे सुद्धा काम पहात असत तर काका हे कामगार महासंघाचे अतिशय निष्ठावान कार्यकर्ते होते व एकप्रकारे माझे ह्या क्षेत्रातील मार्गदर्शक होते सौ ठाकूर यांना घरातच दोन परस्पर विरोधी विचारांचा परिचय झाला त्या मंडळात लागल्यावर त्यांच्या पिताजींनी सुद्धा त्यांना कामगार संघात जाण्याचाच सल्ला दिला त्यांचे वडील व मी एकाच ऑफिस मध्ये काम करीत होतो

नाशिकमध्ये कामगार महासंघात महिलांचे काम खूपच जोमदार होते सौ ठाकूर यांना सौ सुनीता कुलकर्णी, सुमेधा वैद्य, शैलजा महाजन आदी जेष्ठ महिला पदाधिकाऱ्यांचा सहवास आणि मार्गदर्शन लाभले व पुढील काळात ते त्यांना सहाय्यभूत झाले

सौ ठाकूर ह्या सध्या नाशिक पत संस्थेच्या संचालिका आहेत त्यांनी संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणून सुद्धा उत्तम कामगिरी बजावली आहे. पदोन्नतीवर त्यांना अहमदनगर येथे जावे लागले व जवळ जवळ ३वर्षे त्यांना तिथे राहावे लागले परंतु त्यांनी तक्रारीचा सूर लावला नाही संघटनेवर कायम विश्वास ठेवला व संघटनेने सुद्धा विश्वासाला तडा जाऊ दिला नाही

सौ ठाकूर यांनी त्यांच्या पारिवारिक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत त्यामुळे संघटनेसाठी थोडा वेळ देऊ शकतील त्यांच्या अनुभवाचा फायदा नव्या पिढीला मिळू शकेल. त्यांना पुनः एकदा खूप खूप शुभेच्छा.

# १७ सप्टेंबर विश्वकर्मा जयंती–भारतीय कामगार दिन

भगवान विश्वकर्मा यांना भारतीय संस्कृतीमध्ये आद्य कामगार मानले जाते एक सर्वोत्कृष्ठ शिल्पी अशी त्यांची ओळख तर आहेच ह्या व्यतिरिक्त ते मूर्तिमंत त्यागाचे प्रतीक आहेत त्यामुळे त्याग तपस्या व बलिदान हे ब्रीद असलेल्या भारतीय मजदूर संघ त्यांचा जन्म दिवस हाच राष्ट्रीय कामगार दिन म्हणून साजरा करीत असतो व त्यानिमित्ताने ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेचे पूजन होते व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

ह्यावर्षी कोव्हिडं १९ मूळे अनेक मर्यादा आल्या असताना सुद्धा सोशल डिस्टनसिंग चे पालन करून अनेक ठिकाणी प्रतिमा पूजन करण्यात येऊन विश्वकर्मा दिनाचे महत्व सांगण्यात आले.

**विविध ठीकाणी झालेल्या कार्यक्रमांची छायाचित्रे**













उमरेड नागपूर


विद्युत भवन नासिक


सीलापूर




कोराडी निर्मिती


दिपनगर भुसावळ


चंद्रपूर निर्मिती


विरार पत संस्था कार्यालय


पालघर


अमरावती कार्यालय



नांदेड झोन


कल्याण कार्यालय


पुणे
।। श्रम ही आराधना ।।
महाराष्ट्र वीज कामगार महासंघ
संलग्न भारतीय मजदूर संघ (रजि.नं.पी.एन.८७३)
पुणे परिमंडळ
दि. १७/०९/२०२०
विश्वकर्मा जयंती
निमित्त
सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी
नागरीकांना विश्वकर्मा जयंती च्या
हार्दिक शुभेच्छा !
महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचा विजय असो.

# श्रद्धांजली

## १) पूर्व राष्ट्रपती प्रणव मुखर्जी के निधनपर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ का शोक संदेश



कुशल प्रशासक, राष्ट्र-हित सर्वोपरि का भाव जीवन में रख, राजनैतिक अस्पृश्यता से परे व सभी दलों में समान रुप से सम्मानित, मितभाषी, लोकप्रिय पूर्व राष्ट्रपति श्री प्रणब मुखर्जी आज अपनी जीवन यात्रा पूर्ण कर परम तत्व में विलीन हो गए। भारत के राजनैतिक-सामाजिक जीवन में उपजी इस शून्यता को भरना आसान नहीं होगा। संघ के प्रति उनके प्रेम और सद्भाव के चलते हमारे लिए तो वे एक मार्गदर्शक थे। उनका जाना संघ के लिए एक अपूरणीय क्षति है। सभी परिवारजनों को गहरी सह-संवेदना व्यक्त करते हुए प्रभु से प्रार्थना कि वे प्रणव दा को अपने श्री चरणों में स्थान दें।

**मोहन भागवत**, सरसंघचालक

**सुरेश (भय्याजी) जोशी**, सरकार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

## २) वासुदेवराव सांगवीकर यांचे निधन



महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे संस्थापक सदस्य श्री वासुदेवराव सांगवीकर यांचे नांदेड येथे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले दिनकर डबले, जगन्नाथ वैष्णव, बी एच बाळापूरकर, डी व्ही कुळकर्णी ह्या मराठवाड्यातील बुजुर्ग नेत्यांच्या फळीतील महत्वाचे कार्यकर्ते म्हणून त्यांना ओलखळे जात असे शांत व संयमी स्वभाव आणि सगळ्यांशी मिळून मिसळून वागण्याचा त्यांचा स्वभाव असल्याने मित्र संग्रह खूप मोठा होता. मध्यंतरी त्यांचा अपघात झाल्याने घरातून बाहेर पडणे अशक्य झाले होते मी आर टी जोशी सुभाष लोंढे आदींनी त्यांच्या नांदेड येथील निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली ते नाशिक अधिवेशनाला उपस्थित नसल्याने राहून गेलेला सत्कार केला त्यानंतर पुनः भेट झाली नाही आली ती त्यांच्या मृत्यूचीच बातमी बाळासाहेब, एस एन देशपांडे, हरदास, नन्दा ओझे, अण्णा देसाई यांच्या बरोबर काम केलेला आणखी एक सहकारी गेला ही पोकळी भरून निघणे खूप कठीण आहे त्याना विनम्र श्रद्धांजली !!! विलास झोडगेकर

## ३) दुःखद निधन

आपले पुर्णकालिक श्री. जयंत देशपांडे यांच्या मोठ्या भगिनींचे कोल्हापूर येथे दु:खद निधन झाले होते. आज सकाळी त्यांच्या पतीचे अर्थात श्री.जयंतराव यांच्या मेव्हण्यांचे दु:खद निधन झाले. ईश्वर मृतास सदगति देवो हीच प्रार्थना. आपण सर्वजण त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी आहोत.

## ४) सुदर्शन पाड नांदेड यांचे दुःखद निधन



महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे तळमळीने कार्य करणारे नांदेड परिमंडळ येथील संघटनेचे पदाधिकारी श्री सुदर्शन कल्याण पाड प्रधान यंत्रचालक ते तेहतीस केवी सब स्टेशन सोनखेड तालुका लोहा जिल्हा नांदेड यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो तसेच त्यांच्या कुटुंबियांना या दुःखातून सावरण्याची शक्ती देवो ही प्रार्थना.

## ५) ए एच अन्सारी दुःखद निधन

आपले जुने सहकारी व म,रा, विद्युत मंडळ व म, रा, वितरण कंपनीतील सेवानिवृत्त, आस्था, अधिकारी श्री, ए एच अन्सारी यांचे आज मुंबई येथील दवाखान्यात दुःखद निधन झाले. त्यांचे कामगार महासंघाशी अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांनी पूर्ण सेवकाळात कधीही तत्वांशी तडजोड केली नाही सेवा निवृत्तीनंतर सुद्धा काही काळ शिस्त भंग कारवाई चौकशी अधिकारी म्हणून काम केले. भावपूर्ण श्रद्धांजली.

## ६) दुःखद बातमी




कळविण्यात अत्यंत दुःख होते की श्री.प्रशांत भांबुर्डेकर यांचे धाकटे बंधू विनायकुमार मुकुंद भांबुर्डेकर यांचे दि.१३/०९/२०२० ला अकाली दुःखद निधन झाले. परमेश्वर त्यांच्या आत्मास शांती देवो.

## ७) अत्यंत दुखद समाचार

भारतीय मजदूर संघ के क्षेत्रीय संगठन मंत्री श्रीमान अनुपमजी के पूज्य पिताजी का काशी के Apex Hospital में दुःखद स्वर्गवास हो गय।

## ८) डी जी श्रोत्रीय नासिक



कै D.G. श्रोत्रीय सेवानिवृत्त कर्मचारी यांचे वयाच्या ६२ वर्षी अल्पशा आजाराने दिं. १३.९.२०२० रोजी दुःखद निधन झाले ते महापारेषण कंपनीतून नासिक येथून सेवा निवृत्त झाले होते व कामगार महासंघाचे सभासद होते परमेश्वर त्यांच्या आत्मास सद्गती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना.

## ९) साहेबराव भदाणे धुळे

कामगार महासंघाचे धूळे सर्कल चे सर्कल सचीव श्री डिगंबर भदाणे यांचे वडील श्री साहेबराव भदाणे हे दि. ४/९/२० पासुन धूळे सिव्हिल हॉस्पीटल (नवीन) मध्ये आजारी होते. दि १२/९/२० शनिवार रोजी सकाळी ८.३० वा कोरोनामुळे दुःखद निधन झाले. परमेश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो व दूःख सहन करण्याची शक्ती भदाणे परीवारास देवो. कामगार महासंघ धूळे जळगाव व नंदुरबार सर्कल मधील सर्व सभासद व पदाधिकारी तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## १०) दादाजी राठोड कळवण यांचे निधन



कळवण विभागातील गाळण कक्ष येथील कर्मचारी श्री राठोड दादाजी खंडू यांचे दि.१५/६/२० रोजी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो.

## ११) श्रीपाद भावे पुणे



भारतीय मजदूर संघाचे कर्तव्यदक्ष असे पदाधिकारी श्रीपाद भावे यांचे आज सकाळी निधन झाले. ते जिल्हा खजिनदार व संघटनमंत्री होते खूप मेहनती व मनमिळाऊ स्वभाव असा कार्यकर्ता आपणास सोडून गेले आहेत. त्यांच्या अचानक जाण्याने त्याच्या परिवारावर आलेल्या संकटातुन पुढे जाण्यासाठी परमेश्वराने त्यांना शक्ती द्यावी ही प्रार्थना, भावे यांच्या आत्म्यास सदगती लाभो. भारतीय मजदूर संघ पुणे जिल्हा.

## १२) सुहास नामजोशी यांच्या निधनाने हसतमुख कार्यकर्ता महासंघाने गमवला



कामगार महासंघाचे जेष्ठ सेवानिवृत्त कार्यकर्ते, सुहास नामजोशी यांना आज सकाळी अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली आहे. श्री नामजोशी हे आगदी प्रारंभापासून कामगार संघाचे कार्यकर्ते होते हसतमुख चेहरा आणि बोलका चेहरा ही त्यांना लाभलेली दैवी देणगी होती आणि त्यामुळे आगदी पहिल्या भेटीतच माणूस त्यांच्या प्रेमात पडत असे बाळासाहेब साठे, एस एन देशपांडे, आण्णाजी अकोटकर, आण्णा देसाई, विजय मुळगूंद, सुभाष सावजी, नंदा ओझे, एस टी म्हेत्रे ह्या सर्वांबरोबर काम करण्याची संधी त्यांना मिळाली तसेच सर्वांचा सहवास देखील त्यांना लाभला.

विजयराव मुळगूंद ब्रेन स्ट्रोकचे शिकार झाल्यावर त्यांना अध्यात्माकडे वळवण्यात त्यांचा फार मोठा सहभाग होता. त्या निमित्ताने ते विजयरावांच्या अधिक जवळ आले विजयरावांसारखी व्यक्ती भागवत सप्ताहात रमण हे तसं कठीणच परंतु नामजोशींनी अशक्य ते शक्य करून दाखवले

सेवेच्या उत्तरार्धात त्यांना पेण येथे जावे लागले पण तिथे ते रमले नाहीत आणि म्हणून त्यांनी व्हीआर एस घेत पुणे गाठले त्यांचे अनेक क्लेम पेंडिंग होते पण त्यांनी संघटनेला कधी त्रास दिला नाही अर्थात विजयराव यांनीच त्यात लक्ष घालून श्री राम शिंदे यांचा मदतीने ते काढले

सेवा निवृत्तीनंतर ते निवृत्तांच्या संघटनेत रमले अर्थात श्री नामजोशी हे अनेक सामाजिक संघटनांशी जोडलेले असल्याने मित्र परिवार मोठा होता पुण्याला गेलो की त्यांची भेट होत असे निदान खबरबात तरी कळत असे परंतु बरेच दिवसात पुणे येथे जाणे झाले नाही त्यामुळे त्यांची भेट झाली नाही की काही खबरबात नाही आली ती एकदम सावजी यांचेकडून कळली ती त्यांच्या मृत्यूची बातमीच!!

खूप वाईट बातमी हे दुख सहन करण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी व त्यांच्या आत्म्यास सदगती लाभावी हीच प्रभू चरणी प्रार्थना, ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो!

००

श्री एन.पी. बहिरम - (कळवण अर्बन) कक्ष यांचे वडील कै. पांगळु बधु बहिरम यांचे आज दि. २८.०८.२०२० रोजी रात्री ८:३० वा. अल्पशा आजाराने दुःख निधन झाले. श्रद्धांजली.

## श्री आर एन पाटील यांना पत्नी वियोग

**-विलास झोडगेकर**



वीज कामगार महासंघाचे जेष्ठ मार्गदर्शक विदर्भ प्रदेश भारतीय मजदूर संघाचे संघटन मंत्री व वीज कामगार कल्याण निधीचे उपाध्यक्ष श्री आर एन पाटील नागपूर यांच्या पत्नीचे दिनांक २७ सप्टेंबर रोजी दुपारी चार वाजता दुःखद निधन झाले गेल्या ८ ते १० दिवसांपासून त्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होत्या. प्रकृतीत सुधारणा होत आहे असे संकेत मिळत असतानाच पुनः तब्येत बिघडली व त्यातच त्यांचे निधन झाले.

पत्नीचे निधन हा पाटील साहेब यांचेसाठी मोठा धक्का आहे त्यांना ह्या दुःखातून सावरण्यासाठी परमेश्वराने शक्ती द्यावी ह्या दुःखद प्रसंगी आपण सर्व त्यांच्या पाठीशी आहोत


श्री पाटील यांचे नागपूर येथील घरी जाण्याचा मला अनेकदा योग आला तेंव्हा सौ वहिनींनी अतिशय अगत्याने आमचे आदरातिथ्य केले सौजन्य आणि शालीनतेची त्या मूर्ती होत्या. मधुमेहा सारख्या आजाराने त्या स्वतः पीडित असताना व घरी श्री पाटील यांचेखेरीज अन्य कोणीही नसताना सुद्धा आपल्या पतीला त्यांनी बाहेरगावी जाण्यासाठी कधीही अडवले नाही. आपला पती करीत असलेल्या निरपेक्ष कामाबद्दल त्यांना

खूप अभिमान होता. त्यांची खंबीर साथ असल्यामुळेच श्री पाटील भारतीय मजदूर संघाच्या कामासाठी इतका वेळ देऊ शकत असत  कोणत्याही पुरुषांच्या यशामागे कोणी ना कोणी महिला खंबीर पणे उभी असते हे विधान श्री पाटील यांना खऱ्या अर्थाने लागू होते. त्यामुळे सौ वाहिनीचे निधन हे पाटील साहेबांसाठी खूपच क्लेशदायक आहे. परमेश्वरी इच्छेपुढे कोणाचे काही चालत नाही हेच अंतिम सत्य आहे.

परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सदगती प्रदान करो ही प्रार्थना ओम शांती शांती शांती!



श्री. आर. एन.बेडेकर – धुळे येथील कामगार महासंघाचे कार्यकर्ते यांचे बदलापूर येथे अल्पशा आजाराने निधन.



श्री. डी.एस.पिंगळे ड्रायव्हर – धुळे येथील कामगार महासंघाचे कार्यकर्ते यांचे नाशिक येथे अल्पशा आजाराने नाशिक येथे निधन.



श्री. अशोक संतोष हिरे – कळवण येथील महासंघाचे सभासद यांचे कोरोना मुळे दुःखद निधन. ते रोजंदारी कामगार पासून कामगार महासंघाचे सक्रिय सभासद होते.

श्री. नितीन श्रीकृष्ण अंबाडकर उपकार्य अभियंता, कळवण उपविभाग यांचे आजीचे वृध्दापकाळाने निधन झाले आहे.

कै. विजय हनुमंत रामगीर, निवृत्त वरिष्ठ यंत्रचालक यांचे आज मंगळवार दिनांक २९ सप्टेंबर २०२० रोजी पुणे येथे अल्पशा आजाराने वयाच्या सत्तराव्या वर्षी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या आत्म्यास चीरशांती,सद्गती लाभो, हि परमेश्वराकडे प्रार्थना करतो.

तसेच त्यांच्या कुटुंबाला हे दुःख सहन करण्याची शक्ती परमेश्वराने प्रदान करो यासाठी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. महाराष्ट्र विज कामगार महासंघाच्या वतीने भावपुर्ण श्रद्धांजली.

कै. विजय रामगीर यांनी MSEB व महापारेषण मध्ये वरिष्ठ यंत्रचालक म्हणून काम केले असुन अतिशय प्रामाणिकपणे, सचोटीने, स्नेहपुर्वक अशी कंपनीची सेवा केली होती. ते महाराष्ट्र विज कामगार महासंघाचे ज्येष्ठ निष्ठावान कार्यकर्ते व सभासद होते.

अत्यंत दुखद सूचना भारतीय मजदूर संघ मध्य प्रदेश के प्रदेश मंत्री माननीय श्री राकेश चतुर्वेदी जी छिंदवाड़ा का दुखद निधन हो गया है वह चिरायु अस्पताल भोपाल में भर्ती थे भारतीय मजदूर संघ के लिए यह एक अपूरणीय क्षति है ईश्वर से प्रार्थना है कि ईश्वर उन्हें अपने श्री चरणों में स्थान प्रदान करें तथा शोक संतप्त परिवार को इस कष्ट को सहन करने की शक्ति प्रदान करें.

विनम्र श्रद्धांजली.



# 'हमारा तीसरा पर्याय – एकात्म मानव दर्शन' लेखमाला

**आर्थिक संकट – हमारा और दुनिया का (लेख क्र.१)** मा. दत्तोपंत ठेंगडी जी के इस जन्मशती वर्षमें हम उनका प्रिय और गहन विचार का विषय तीसरा पर्याय (Third Way) इसपर हमारा तीसरा पर्याय – एकात्म मानव दर्शन इस लेखमालामे विचार करेंगे. पं.दीनदयाल उपाध्याय तथा मा. ठेंगडी जी ने यह स्पष्ट किया है कि भारतीय चिंतनपर आधारित, दुनिया की स्थिति ध्यानमें लेते हुए और देश के परम वैभव का मार्ग प्रशस्त करनेवाला यह तीसरा पर्याय एकात्म मानव दर्शन नामसे सामने रखा गया है. लेखमालामें हमारे देशमे और दुनियामे व्याप्त आर्थिक संकट, इससे उबरनेमें पश्चिम के विचारों की विफलता तथा एकात्म मानव दर्शन यह कारगर उपाय है। इस संबंधमे विविध पहलूं तथा आयामोंपर आजकी स्थिति का ध्यान रखते हुए हम संक्षेपमें विचार करेंगे.

## हमारी आधी-अधुरी आर्थिक प्रगति

१९४७ में स्वाधीनता प्राप्त कर लेने के बाद ७३ वर्षों में देशमें अनेक क्षेत्रोंमें प्रगति हुई है उदा. १) आरोग्यसेवामे काफी सुधार हुआ. १९५० की तुलनामें आज देश की आबादी ३६.१ करोडसे बढकर १३२ करोड, जन्मतेही मरनेवाले बच्चों की संख्या हजारमे १३४ से घटकर ३२, आयुर्मान ३२ से बढकर ६९ साल, मृत्युदर हजारमें २८ से घटकर ७. २) साक्षरता दर १८% से बढकर ७४%. प्रतिव्यक्ति आय रु. २५५ से बढकर १,३५,०५०. ३) गेहूँ उत्पादन ७ से १०६ दशलक्ष टन, प्रतिव्यक्ति बिजली खपत १६ से ११८१ युनिट्स. ४) उच्च तकनिकी क्षेत्र सॅटेलाईट, मिसाईल्स, अणुविद्युत, संगणक सॉफ्टवेर इ. मे हम दुनिया के अग्रणी देश बन गए हैं. भारी उद्योग स्थापित हुए हैं. भारत दुनिया की ५वी सबसे बड़ी अर्थव्यवस्था बना है.

लेकिन ये सब होते हुए भी लगभग सभी विचारकों का यह मत है कि विकास हुआ लेकिन विकास की जितनी संभावना थी उस की तुलनामें बहुत कम विकास हुआ. देशभरमें एक बहुत बड़ा तबका गरीबी, बेरोजगारी, साधनहीन, अवसरहीन स्थितिमें जीवन-यापन कर रहा है. मानव विकास सूचकांकमे भारत २०१९मे १८९ देशोंमें १२९वे स्थानपर है. २१% लोग आजभी गरीबी रेखा के नीचे हैं, जून२०१९में २.४ करोड परिवारों को अंत्योदय योजना लागू करनी पडी, बड़े शहरोंमें झुग्गी-झोपडियोंमें करोडो लोग नरकीय जीवन जी रहे हैं, विद्यालयों के सर्वेक्षण बताते हैं कि प्राथमिक और माध्यमिक शिक्षा क्षेत्रमें पढने की, गणित की गुणवत्ता घट रही है और हालत बद से बदतर होती जा रही है. अनाज भंडार भरा है लेकिन किसान बेहाल है, उनकी आत्महत्याएँ बढी हैं. लगभग ९०% श्रमिक असंगठित क्षेत्रमें जहाँ उनको जीवन का आनंद और प्रगति के अवसर मिलना मुश्किल होता है. मार्च २०२०में बेरोजगारी दर ८.८% थी. पिछले पांच महिनोंसे करोना महामारी का संकट इन प्रश्नों को और गहरा कर रहा है।

हमारी विकासयात्रा क्यों लडखडा रही है? प्राकृतिक संसाधनों की प्रचूर उपलब्धि, हर प्रकार के हुन्नर का श्रमिकवर्ग, नवस्वाधीनता की उमंग, प्रगति की अपार संभावनाएँ ये सारी अनुकूलताएँ थी. लडखडाने का प्रमुख कारण हमारे राजनैतिक नेतृत्व का अधपके पश्चिमी विचारों की नकल करने में लगे रहना यही है. समाजवाद, लोकतांत्रिक समाजवाद, समाजवादी पैटर्न और फिर वैश्वीकरण के भँवरमे हमने अपने स्वत्व की ओर देखनेसे इन्कार किया. स्वदेशी शक्ति को समझाही नही. नतीजा यह हुआ कि हम दूसरे दर्जेके देश बने रहे जबकि चीन, कोरिया, तथा दूसरे विश्वयुद्ध मे जले हुए जर्मनी, जपान हमारेसे आगे निकल गए. हमारी अर्थव्यवस्थापर विदेशी शिकंजा कसता गया.

**दुनिया का संकटभरा अर्थव्यवहार** १) वैश्विक आर्थिक अस्थिरता वर्तमान जागतिक परिस्थिति आर्थिक दृष्टि से अस्थिर है. देखिए- अमेरिकन सरकार एवं प्रजा दोनों कर्जे में डुबे हुए हैं. जनता क्रुध्द है और पूंजीवाद के केन्द्र समान वॉलस्ट्रीट पर धावा बोल रही है। वायु मण्डल संघर्षमय है।

युरोप की सरकारें भी कर्जे में डूबी हुई और बेंक्स अस्थिर हैं. अतिकल्याणकारी (cradle to grave) व्यवस्था के कारण कई देशोंमे दिवालिएपन की स्थिति आ गई है. - जपान गत दस-पंद्रह वर्ष से वह मंदी के चंगुल में फंसा हुआ है. सूद के दर ०% है. - चीन, भारत, रशिया, ब्राझिल इत्यादि देशों की अर्थव्यवस्था तुलनामें अच्छी थी पर कुल जागतिक व्यापार मे उतार चढाव के कारण वहां भी अस्थिरता आई है. २) अस्थिरता के कारण ये अस्थिरता मुख्यत: अमेरिका एवं युरोपीय देशों की फिजुलखर्ची, स्वार्थी युध्दों के पीछे किये गये अगणित खर्च, बड़ी कंपनियों का मुनाफा बढता रहने के लिये उपभोगवाद को ही दिया जा रहा बढावा देना इत्यादि कारणों से है. दूसरी ओर इन देशोंमें वंचित नागरिकों का बढता हुआ प्रक्षोभ आर्थिक एवं सामाजिक दोनों ही कारणों से है. ३) पश्चिम के इस संकट के प्रमुख आयाम १ अनिर्बंध उपभोगवाद, २ प्रदूषणसे पर्यावरण का संकट, ३ आर्थिक विषमता, ४ बेरोजगारी, ५ गरीबी, ६ बढते मानसिक तनाव, ७ ढह रही परिवार व्यवस्था, ८. आतंकवाद यह सब प्रश्न मुख्यरूप से अधपके पाश्चात्य अर्थशास्त्र के अनुसार किये गये व्यवहार के कारण ही है. पश्चिम के पास इनपर कोई कारगर उपाय नही. इनसे उबरने का उपाय अपना तीसरा पर्याय याने एकात्म मानव दर्शन बताता है (देखिए आगामी लेख).

## पूँजीवाद और कम्युनिझम की विफलता

पश्चिम में राष्ट्रव्यवहार में सामान्यत:दो प्रमुख पध्दतियां मानी जाती थी - पूँजीवाद और कम्युनिस्ट पध्दति. १९६२ में कामगारों के सामने कानपुर में दिये गये भाषण में मा.ठेंगडीजीने स्पष्ट रूप से कहा था कि १९९० में कम्युनिझम धराशायी होगा. और १९८९में कम्युनिस्ट पद्धति सोवियत रूसमें धराशायी हुई. इसको पूंजीवाद का विजय माना गया। और अब केवल पूंजीवाद ही एकमेव सुयोग्य पध्दति है ऐसा प्रतिपादन किया गया।

प्रज्ञा प्रवाह को संबोधित करते हुए जुलै १९९६में (नयी चुनौतियाँ) मा.ठेंगडीजीने कहा था जो समाज-व्यवस्थाएं सनातन धर्म की परिधि के बाहर रहेंगी, उनके अन्दर अन्तर्विरोध उत्पन्न होना अपरिहार्य है. ऐसी समाज-

व्यवस्थाएं अपने ही अन्तर्विरोध के बोझ के नीचे दबकर नष्ट हो जाती हैं. इसी क्रम में कम्युनिज्म समाप्त हो चुका है और पूँजीवाद (कैपिटलिज्म) सन् २०१० के पूर्व ही समाप्त हो जायेगा, ऐसा हम आश्वस्त होकर आपको कह सकते हैं. पूँजीवाद लडखडा रहा है, उसके पास ऊपर गिनाए हुए आजके महत्वपूर्ण प्रश्नों के उत्तर नही है. २००८में उसे दूसरा बड़ा झटका लगा और तबसे पूँजीवाद का तथा वैश्विक अर्थव्यवहार का संकट गहराता जा रहा है. अब करोना महामारीने तो पूँजीवाद को और भी दुर्बल कर दिया है. पर्याय नही है ऐसा सोचकर पूँजीवाद को ले बैठे हैं. इसके के संभाव्य पतन की झलक विख्यात पश्चिमी चिंतक पॉल सॅम्युअलसन (नोबेल पारितोषक विजेता अर्थशास्त्री) या पीटर ड्रकर (दुनिया के सबसे प्रसिद्ध मॅनेजमेंट गुरू) इनके लेखोंमें भी मिलती है.

## दुनियाभरमे तीसरे पर्याय की खोज

कम्युनिझम की हार के बाद और पूँजीवाद की भी अधोगति देखकर अमेरिका के साथ सभी देशो में तीसरे पर्याय की खोज आरंभ हुई. अमेरिका के भूतपूर्व अध्यक्ष बिल क्लिंटन एवं इंग्लैंड के भूतपूर्व प्रधानमंत्री टोनी ब्लेअर, जर्मनी के चान्सेलर गे-हार्ड श्रोडर अपने सिध्दांतों को थर्ड वे के नाम से बताते थे. वर्तमान में पश्चिम में लंडन स्कूल ऑफ इकोनोमिक्स के निदेशक एंथनी गिडन्स और नॉर्मन कूर्लंड जैसे ख्यातनाम विचारक अपना थर्ड वे प्रस्तुत करते हैं.

मा. ठेंगडी जी कहते थे हमें अभिप्रेत होनेवाला भविष्यकालीन नमूना -तीसरा मार्ग- भूतकाल के आधारपर, वर्तमान की आवश्यकताओं का भान रखते तथा भविष्यकालीन आकांक्षाओं की ओर ध्यान देते, साकार करना आवश्यक है. एकात्म मानव दर्शन यही वह तीसरा पर्याय है. अपने इस राष्ट्रीय पर्याय के बगैर हम सही प्रगति नही कर पाएंगे. यह सशक्त पर्याय हमारे पास उपलब्ध है, लेकिन आजतक के सरकारोंने इसकी अनदेखी की. इसे राष्ट्रजीवनमें उतारने के लिए सभी को प्रयास करने पड़ेंगे. (अगले लेखमें इस पर्याय की रूपरेखा संक्षेपसे देखेंगे)

**(रवीन्द्र महाजन, मुंबई, सितम्बर२०२०)**

# 'हमारा तीसरा पर्याय – एकात्म मानव दर्शन' लेखमाला

**एकात्म मानव दर्शन – रूपरेखा (लेख क्र.२)** पं. दीनदयालजीने एकात्म मानव दर्शन मुंबई मे अपने चार भाषणों मे अप्रैल १९६५में पहली बार सार्वजनिक रूप से प्रस्तुत किया. फरवरी १९६८में उनकी हत्या होने के बाद पू. श्रीगुरुजी, मा.ठेंगडी समेत अनेक लोगोंने उसका विस्तार किया. मा.ठेंगडीजीने कहा पं० दीनदयाल जी ने सनातन धर्म का युगानुकूल भाष्य एकात्म मानव दर्शन के रूप में किया हुआ है. उसका अर्थ यह है कि मनुष्य और अपने समाज के स्वभाव के मूल भाव को समझकर सभी के हितकारी ऐसे तत्त्वों के आधारपर, युगानुकूल याने आजकी परिस्थिति के अनुरूप समृद्ध राष्ट्रव्यवहार के सूत्र.

### एकात्म मानव दर्शन – मूलभूत सूत्र १ वैश्विक एकात्मता

हिन्दू जीवनदृष्टि यह मानती है कि दुनियामें जो भी है एक ही चैतन्यतत्त्व से विकसित हुआ है. इसलिए विविधता से भरे हुए इस विश्व के सभी घटकों मे मूलत: एकात्मता है. २ वैयक्तिक आत्मिकता से वैश्विक आत्मिकता तक उन्नयन.

हमारे देश में यह सनातन विचार चलता आया है कि मनुष्य के चैतन्य का अखण्ड विकास होना चाहिए्। मनुष्य जब पैदा होता है तो उसको स्वयं के अलावा और किसी का ध्यान नहीं रहता और जब बड़ा होता है तो माँ बाप, भाई तथा अपने परिवार के साथ वह एकात्म होता है। चेतना का और विकास होता है तो समाज के साथ एकात्म होता है, चेतना और विकसित होती है तो वह राष्ट्र के साथ एकात्म होता है और इस चेतना का विकास होतेहोते वह इस स्थिति में पहुँच जाता है कि सम्पूर्ण मानवता के साथ वह अपने को एकात्म समझने लगता है। फिर इससे भी ऊपर जाकर एक दिन सम्पूर्ण चराचर विश्व के साथ वह एकात्म होता है। उसे स्वदेशो भुवनो त्रयम् की अवस्था प्राप्त हो जाती है। ३) त्रिगुणात्मकता- प्रकृति में अर्थात इस स्थूल सृष्टि में सतत परिवर्तन होना ही कार्यरत तत्व है। सत्व (प्रकाश, ज्ञान) रज (क्रियाशीलता) व तम (आलस्य, जडता) ये आपस मे असंख्य मिश्रण बनाते रहते हैं जिनके द्वारा लगातार इस सृष्टि का स्वरूप बदलता रहता है। मनुष्य का शरीर मन तथा बुध्दि भी इस सत्व, रज और तम जैसे त्रिगुणों का मेल है। उनके द्वारा व्यक्त होती विविध वृत्तियों को ध्यान मे रखकर परिवार, गुट, संस्था, समाज इनमें उनका ठीक मेल बिठाना. ४) चतर्विध मानवी व्यक्तित्व- शरीर-मन-बुध्दि-जीवात्मा इन चारों का मेल ही मनुष्य का व्यक्तित्व है। मनुष्य के जीवन व्यवहार की उत्तम व्यवस्था करने कि लिए सभी चारों का विचार करना चाहिए. ५) पुरूषार्थ चतुष्ट्य- पुरुषार्थ का अर्थ है अपनी इच्छापूर्ति के लिये किया जानेवाला समग्र प्रयत्न तथा लक्ष्यप्राप्ति. पुरूषार्थ की संकल्पना मे धर्म, अर्थ, काम तथा मोक्ष ये चार पहलू हैं। धर्म-अर्थ-काम-मोक्ष इन चार पक्षों को इस क्रम में लिखने का एक विशिष्ट अर्थ है। अर्थ (साधन जैसे विद्या, शस्त्र, पैसा इ.) तथा काम (इच्छाएँ) को धर्मानुसार होना चाहिये अर्थात उनको सामाजिक नीति की मर्यादा मे रहना चाहिये। अंतिम लक्ष्य मोक्ष याने ईश्वरप्राप्ति जिससे जीवन साफल्य अर्थात चिरंतन निरामय आनंद की प्राप्ति होगी. पुरुष याने मानव, उसमें पुरुष और स्त्री दोनों का समावेश है.

**पान नं. ३३ वर चालू...**

# 'हमारा तीसरा पर्याय – एकात्म मानव दर्शन' लेखमाला

एकात्म मानव दर्शन – राष्ट्रजीवन के व्यवहार सूत्र १) वैश्विक एकात्मता और एक तत्त्व के विभिन्न आविष्कार– सृष्टि के सभी घटकोंमें एकही चैतन्यतत्त्व है और इसलिए बंधुत्व का भाव स्वाभाविक है जो सामाजिक जीवन में समरसता तथा सहयोग का आधार है. किसी दो व्यक्ति मे भिन्नता होकर भी समानता पाई जाती है। इन दोनो ही गुणों का ऐसा मेल कराना पडेगा कि जिसके कारण व्यक्ति का विकास हो और वह सामूहिक जीवन के हितमें हो. २) चतुर्विध मानवी व्यक्तित्व– रोटी पहली आवश्यकता लेकिन केवल वह मिलने से मनुष्य सुखी नही होता. इसलिए समाजव्यवहार और व्यक्ति का उसमें सहभाग उसकी शरीर, मन (उदा. सम्मान, मनोरंजन), बुद्धि (उदा. कौशलअभिव्यक्ति) और आध्यात्मिक आवश्यकता (उदा.सेवा) इनका विचार करके हो. पश्चिम की सोच के अनुसार मनुष्य केवल स्वार्थी, केवल आर्थिक (Homo Economicus) या केवल सामाजिक प्राणी है. हम इसे स्वीकारते नही. ३) समग्रता विचार एवं व्यवहार– सभी काम सर्वजनहिताय याने सभी का हित साधनेवाली होने चाहिए, केवल किसी वर्ग या जाति या बिरादरी का हितसाधन ना हो. वैसेही नगर हो या ग्राम सभी क्षेत्रों के संतुलित विकास की चिंता हो. ४) धर्म– धर्म को हम समाजव्यवस्था का नियामक मानते हे. धर्म का अर्थ समाजधारणा के लिए उपयुक्त धारण, पोषण के मार्गदर्शक तत्त्व व नैतिक अंकुश. धर्म का अर्थ मजहब या रिलीजन (जो कि एक अपना एक खुदा या गॉड, एक प्रेषित, एक पुस्तक इनपरही विश्वास करते हुए दूसरों को नष्ट करनेपर तुले हुए है) नही. धर्म मानव उन्नयन की व्यापक संकल्पना है जो किसी एक उपासनापद्धती से जुडी नही.

प्राचीनकाल मे राजसत्तापर धर्मसत्ता का नैतिक बंधन होने के कारण राजसत्ता मनमानी नहीं कर सकती थी, तथा उसकी लोकाभिमुखता बनी रहती थी। सत्ताधारिओं पर ऐसे नैतिक बंधन आज भी आवश्यक है। ५) स्वायत्त व्यवस्थाओं का विचार– हमारे समाजमें धर्मोपासना क्षेत्र, राज्यसंस्था, शिक्षा व्यवस्था, अर्थव्यवस्था (उद्योग–व्यापार) इ. तथा कलाक्षेत्र जैसे विविध स्वायत्त क्षेत्रों का विकास हुआ था. स्वायत्त याने राज्यसरकारपर के अधिकारमें नही और पैसे के लिए भी अवलंबित नही. इससे तेजस्वी, उच्च गुणवत्तावाले नागरिक तैयार होते थे. हमें ऐसी व्यवस्थाओं की ओर जाना होगा. ऐसी प्रत्येक व्यवस्था स्वायत्त व स्वयंपूर्ण हो और साथ साथ उस जीवनक्षेत्र की सभी व्यवस्थाओं से परस्परपूरक तथा परस्परसंबध्द हो यह दृष्टि थी। ६) पर्यावरण स्नेह व संयमित दोहन– मानव व सृष्टि इनमें आपस मे जैविक एकात्मता है, इसीलिये अपनी संस्कृति मे प्राकृतिक पुनर्निर्माण की चक्रीय प्रक्रिया बाधित न हो, पर्यावरण की धारणक्षमता बढे यही विचार है. प्राकृतिक संसाधन का उपयोग करनेमें संयमित दोहन की भूमिका है, शोषण की नही।।

अपना जीवन दर्शन सामान्य मनुष्य के सहज प्रवृत्तियों को नकारता नही। उपभोग की इच्छा प्रचंड शक्तिशाली है। मनुष्य अपनी सहजवृत्ति का एकदम विरोध करे, अपनी इच्छा आकांक्षा को मारता रहे ऐसी अपेक्षा नही है. ऐहिक सुख के पीछे भागते हुये मनुष्य को केवल संयम बरतने के लिये कहा है। ७) विकेंद्रीकरण– राष्ट्रजीवन के सभी क्षेत्रोंमे यथासंभव अधिकाधिक विकेंद्रीकरण आवश्यक है. इससे हर स्तरपर उत्तरदायित्व बढेगा और एकाधिकारशाही उस मात्रामे कम होगी. व्यक्ति तथा हर स्तर के शासन के अधिकार तथा कर्तव्यों का मेल ठीकसे बैठ सकेगा. ८) पूर्णत्व– पूर्णत्व की आस आध्यात्मिक एवं व्यावहारिक दोनों ही क्षेत्रोंमे महत्वपूर्ण है. व्यक्ति के सृजनात्मक (Creative, innovative) प्रवृत्ति को ढूँढना, अवकाश देना,संवर्धन करना होगा. व्यक्ति की स्वयंप्रेरणा तथा उपक्रमशीलता को प्रोत्साहन मिलना चाहिए. पूर्णत्व की लगनसे व्यक्ति की कर्मशीलता बढती है, उसके आत्मविश्वास तथा आत्मसम्मानमे वृद्धि होती है और सभी कार्य निखरते हैं. (अगले लेखमे एकात्म मानव दर्शन की प्रासंगिकता)

**(रवीन्द्र महाजन, मुंबई, सितम्बर २०२०)**

Postal Regd. No. NSK/RNP-244/2018-2020

**प्रति,**

STAMP

If not delivered, please return to :

मजदूर संकेत

४, 'मार्शल आर्केड', राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक-४२२ ००२.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक श्री. कमलाकर कृष्णाजी मोहरीर यांनी जनरल सेक्रेटरी, भारतीय मजदूर संघ (महाराष्ट्र प्रदेश) यांचे करिता विकास प्रिंटींग ॲन्ड कॅरिअर्स प्रा. लि., प्लॉट क्र. ३२, सातपूर औद्योगिक वसाहत, त्र्यंबक रोड, नाशिक– ४२२ ००७ येथे मुद्रित करून ४, मार्शल आर्केड, राका कॉलनी, शरणपूर रोड, नाशिक – ४२२ ००२ येथून प्रसिद्ध केले. फोन / फॅक्स : ०२५३ – २५७९१६७

• संपादक : कमलाकर कृष्णाजी मोहरीर •